दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि.४ डिसेंबर २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १०१ ✻ पृष्ठ ८ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

वैमनस्यातून तिघांवर कोयत्याने वार, कासेवाडीतील घटना; सराइतांविरुद्ध गुन्हा

पुणे : वैमनस्यातून सराइतांनी तिघांवर कोयत्याने वार केल्याची घटना भवानी पेठेतील कासेवाडी भागात घडली. याप्रकरणी सराइतांसह साथीदारांविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अजय हरिसिंग परदेशी (वय ४४), जय अनिल परदेशी (वय २१) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी सादिक महंमद शेख (रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी), नूर नजीर शेख, इरफान शेख (दोघे रा. नाडेगल्ली, गणेश पेठ), सलीम कासीम तांबोळी, इम्रान उर्फ इम्मू सत्तार शेख (दोघे रा. कोंढवा) यांच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत सोनू उर्फ मौंटी अनिल परदेशी (वय २७, रा. म्हसोबा मंदिराजवळ, कासेवाडी, भवानी पेठ) याने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि फिर्यादी परदेशी ओळखीचे आहेत. यापूर्वी त्यांच्यात वाद झाले होते. बुधवारी मध्यरात्री आरोपींनी सोनू परदेशी याचे काका अजय आणि लहान भाऊ जय यांना कासेवाडी भागात अडवले. त्यांच्यावर कोयत्याने वार केले. त्यावेळी काका आणि लहान भावाला सोडविण्यासाठी गेलेला सोनू याला जिवे मारण्याची धमकी देऊन त्याच्या डोक्यावर कोयत्याने वार केले. आरोपींनी कोयते उगारून दहशत माजविली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक आकाश थिटे तपास करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रशंसा

दुर्गम, नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र विविध स्तरांवर प्रयत्नशील
गडचिरोलीसह परिसरातील नागरिकांचे प्रधानमंत्र्यांकडून अभिनंदन

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. नववर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेला गडचिरोली दौरा हा येथील नागरिकांच्या आयुष्यात सुख-समाधान आणण्यासह सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'एक्स'च्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वर्षाच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध विकासकामांची सुरूवात करतानाच सामाजिक सलोखा



आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला. गडचिरोली यापुढे महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नसून तो पहिला जिल्हा ठरण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच, याठिकाणी सुरू असलेल्या औद्योगिकीकरणामुळे इथल्या नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, अशी ग्वाही यावेळी दिली.

गडचिरोलीच्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करण्यासह नागरिकांना मुख्य प्रवाहात आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पाठिंबा आणि मार्गदर्शन यामुळेच गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि आदिवासी भागांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर नमूद केले आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करून आदिवासी बांधवांचे जल, जमीन आणि? जंगल हे हक्क अबाधित ठेवत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला. या बसमधून त्यांनी प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६ हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे श्री. फडणवीस यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गडचिरोली जिल्ह्याची ही विकासयात्रा यापुढेही सुरू राहील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी येथील नागरिकांना दिला.

तुळशीबागेत महिलेच्या गळयातील दागिने चोरी

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या गळयातील ६१ हजारांची सोनसाखळी चोरुन नेल्याची घटना घडली. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नाशिकमधील आहेत. त्या बुधवारी तुळशीबागेत खरेदीसाठी आल्या होत्या. सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास त्या तुळशीबागेतील एका विक्रेत्याकडून खरेदी करत होत्या. त्यावेळी गर्दीत चोरट्याने महिलेच्या गळयातील ६१ हजारांची सोनसाखळी चोरुन नेली. पोलीस कर्मचारी जाधव तपास करत आहेत.

कात्रज भागातील राजस सोसायटी परिसरात दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळयातील ७० हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेची मुलगी कात्रज भागातील एका शाळेत आहे. गुरुवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास त्या मुलीला शाळेत सोडण्यासाठी निघाल्या होत्या. सोसायटीच्या प्रवेशद्वारासमोर त्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या गाडीची वाट पाहत थांबल्या होत्या. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळयातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी तपास करत आहेत.

राष्ट्रीय सुरक्षिततेबाबत भारतीय सैन्यदल सक्षम : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'नो युवर आर्मी' मेळाव्याचे उद्घाटन

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : भारत राष्ट्रीय सुरक्षिततेच्या अनुषंगाने अंतर्गत आणि बाह्यबाजूने मजबूत आहे; भारतीय सेना जगातील उत्तम सेनेपैकी एक असून भू, जल व वायू अशा कोणत्याही मार्गाने होणाऱ्या हल्ल्यास प्रतिकार करण्यास सैन्यदल सक्षम आहे, असे गौरवोउद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

'समर्थ भारत सक्षम सेना' या प्रेरक संकल्पनेअंतर्गत दक्षिण कमांडच्यावतीने रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब येथे आयोजित 'नो युवर आर्मी' मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे,



दक्षिण कमांडचे आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशक आंचल दलाल, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल सतीश हंगे, माजी राज्य मंत्री दिलीप कांबळे, माजी आमदार विलास लांडे, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या मेळाव्यात भारतीय सैन्यदलाच्या क्षमता आणि संरक्षण क्षेत्रात चाललेल्या स्टार्टअप आणि नवोन्मेषाचे सुरू असलेले प्रचंड काम पाहायला मिळत आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून नागरिकांना भारतीय सैनिकांशी संवाद साधता येणार आहे, शिवाय युवकांना भारतीय सैन्यदलात भरती होण्याच्यादृष्टीने प्रेरणा मिळणार आहे. भारतात संरक्षण क्षेत्रात सुरक्षितेतच्यादृष्टीने निर्माण केलेल्या विविध अत्याधुनिक उपकरणांची माहिती देणारे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भारतीय सैन्यदलाचे यांनी अभिनंदन केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केंद्रीय संचार ब्युरोच्यावतीने भारतीय सैन्याचे साहस, शौर्याच्या क्षमतेचे दर्शन घडविणाऱ्या छायाचित्रांचे बहुमाध्यम प्रदर्शनास भेट देवून माहिती जाणून घेतली. तसेच परिसरातील विविध संरक्षण विषयक अत्याधुनिक शस्त्रे, रणगाडे, उपकरणाची पाहणी करुन माहिती घेतली.

महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत 'महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन' साजरा करण्यात आला. पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय असून हे देशातील आदर्श पोलीस दल असल्याचे प्रतिपादन राज्यपाल राधाकृष्णन यांनी केले. गोरेगाव येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, पोलीस जवान व निमंत्रित उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, मागील काही वर्षांमध्ये पोलीस दलातील आव्हाने वाढली आहेत. सागरी सुरक्षा, नक्षलवाद यांसारखे धोके आहेतच. त्याशिवाय सायबर सुरक्षा, युवकांमध्ये वाढती नशाखोरी आदी नव्या आव्हानांमुळे पोलिसांना अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. राज्य शासन पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर पोलीस

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा

भरती देखील होत आहे. यामध्ये महिलांची वाढती संख्या ही उल्लेखनीय बाब आहे. महाराष्ट्र पोलीस हे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्यांच्या अद्वितीय समर्पण, शौर्य आणि उत्कृष्टतेसाठी ओळखले जातात. या जबरदस्त दलाने दहशतवादी हल्ले, संघटित गुन्हे, टोळी युद्धे आणि बॉम्बस्फोट अशा असंख्य आव्हानांना सामोरे जात त्यांचा यशस्वी सामना केला असल्याचे राज्यपालांनी यावेळी नमूद केले.

मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यात दहशतवाद्यांना पकडून देण्यासाठी गोळ्या झेललेल्या तुकाराम ओंबळे यांच्या शौर्याचे राज्यपालांनी विशेष कौतुक केले. अशा शौर्याच्या माध्यमातून भारत कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नसल्याचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. एक गुन्हेगार पुढे टोळीचे रूप धारण करू शकतो, त्यामुळे अनधिकृत शस्त्रे, अमली पदार्थ यांना पायबंद घालून महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी नष्ट करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

२ जानेवारी १९६१ रोजी भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता. त्यामुळे २ जानेवारी हा दिवस पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो, अशी माहिती पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी प्रास्ताविकाद्वारे दिली. भयमुक्त वातावरण ठेवून सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरुवातीला राज्यपालांनी वर्धापन दिन संचलनाचे निरीक्षण केले व शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये राज्य राखीव पोलीस बल पथक, मुंबई पोलीस सशस्त्र दल पथक, मुंबई पोलीस महिला पथक, ठाणे शहर- लोहमार्ग पोलीस पथक, मुंबई पोलीस दंगल नियत्रंण पथक तसेच निशान टोळी सहभागी झाले होते. यावेळी विशेष संचलन आणि हर्ष परेड सादर करण्यात आली. तसेच पाईप बँड आणि सायलेंट आर्म ड्रिल ची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यावेळी महासंचालकांनी राज्यपालांना स्मृतिचिन्ह प्रदान केले.

सावंगी रुग्णालयाच्या मूत्रविकार विभागात अतिदुर्मिळ शस्त्रक्रिया रोबोटिक सहाय्यक शस्त्रक्रियेने केली जन्मजात व्याधीवर मात

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : जन्मतः असलेली लघवीगळती आणि त्यात वाढत्या वयात सुरू झालेली पोटदुखी, यातून मार्ग काढत आधुनिक वैद्यकीय सुविधांच्या मदतीने २१ वर्षीय तरुणीचे जगणे सुखकर करणारी अतिदुर्मिळ व जटिल शस्त्रक्रिया रोबोटिक सहाय्यतेने सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील मूत्रविकार विभागात करण्यात आली.

सेलू तालुक्यातील एका गावात वास्तव्य असलेल्या या तरुणीला जन्मापासूनच सतत लघवी गळण्याचा त्रास सहन करावा लागत होता. बालपणापासून तर युवावस्थेत येईपर्यंत अनेक डॉक्टरांकडे तपासणी करण्यात आली, मात्र लघवीगळतीपासून तिची सुटका झाली नाही. वय वाढत असताना तिला डाव्या



बाजूला तीव्र पोटदुखीचा त्रास नव्याने सुरू झाला आणि वाढत्या वयासोबत हा त्रासही दिवसेंदिवस वाढू लागला. या त्रासाचा परिणाम तिच्या दैनंदिन जीवनावर होऊ लागला. सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही, अशी अवघड अवस्था झाली असताना तिला अखेर गावातील ज्येष्ठांच्या सांगण्यावरून सावंगी येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सावंगी रुग्णालयात भरती झाल्यानंतर मूत्रविकार विभागाच्या तज्ज्ञांनी या स्त्रीरुग्णाची संपूर्ण तपासणी करीत योग्य निदान करण्यासाठी आवश्यक चाचण्या केल्या. तपासणीदरम्यान सीटी युरोग्राफी व डीटीपीए स्कॅनच्या माध्यमातून रुग्णाच्या डाव्या बाजूची किडनी केवळ ३ बाय २ सेंमी आकाराची असल्याचे दिसून आले. सामान्यतः या वयातील स्त्रीच्या शरीरातील किडनीचा आकार १० बाय ४ सेंमी असतो. याशिवाय, डाव्या बाजूची मूत्रवाहिनी प्रचंड फुगलेली आणि मोठ्या प्रमाणावर क्षतिग्रस्त झालेली दिसून आली. किडनी आणि मूत्रवाहिनी कार्यक्षम नसल्यामुळे दोन्ही काढून टाकणे, हाच एकमेव उपाय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र कमी वय आणि नाजूक शारीरिक ठेवण, यामुळे सामान्य प्रकारची शस्त्रक्रिया करण्याबाबत पुन्हा साशंकता निर्माण झाली.

अखेर रुग्णाच्या शारीरिक स्थितीचा विचार करून शल्यचिकित्सक तज्ज्ञांनी रोबोटिक सहाय्यक तंत्रज्ञानाद्वारे ही शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सावंगी रुग्णालयातील नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अभिजित ढाले यांनी डॉ. जय धर्माशी, डॉ. शिवचरण भालगे, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. वर्मा तसेच परिचारिका व तंत्रज्ञ यांच्या सहकार्याने नेफ्रो युरेटरेक्टोमी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्णत्वाला नेली. या प्रक्रियेत कार्यक्षम नसलेली डावी किडनी आणि फुगलेली मूत्रवाहिनी संपूर्णपणे काढून टाकण्यात आली. शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक रोबोटिक उपकरणांचा वापर केल्याने ती अधिक अचूक, कमीतकमी इजा पोचविणारी, कमी त्रासाची आणि रुग्ण व शल्यचिकित्सकांना पूर्णतः समाधान देणारी ठरली.

शस्त्रक्रियेनंतर सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून ती आता पूर्णपणे या व्याधीतून मुक्त झाली आहे. सततच्या त्रासातून आणि दैनंदिन जीवनप्रणालीत आलेल्या मर्यादांमधूनही तिला दिलासा मिळाला आहे. अशा प्रकारची शस्त्रक्रिया आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाच्या मूत्रविकार विभागात प्रथमच करण्यात आली असून दर्जेदार वैद्यकीय सुविधा, अत्याधुनिक रोबोटिक उपकरणे आणि डॉक्टरांचे कौशल्य यातून एक नवा मापदंड या रुग्णालयाने निर्माण केला असल्याचे मत रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक तथा रोबोटिक सर्जन डॉ. चंद्रशेखर महाकाळकर यांनी नमूद केले आहे. या विशेष उपचारांसाठी रुग्ण आणि तिच्या कुटुंबीयांनी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

सिझेरीयनचा खर्च जिवाच्या वर : जननी सुरक्षा योजनेची घ्या मदत

गरोदर मातेला लाभ:प्रसुतीनंतर ७ दिवसात रक्कम खात्यात; २ हजार ६१४ लाभार्थींनी घेतला लाभ

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा: कुशल व्यक्तींकडून आरोग्य संस्थेत बाळंतपण व्हावे व माता मृत्यु व अर्भक मृत्यु दर कमी करावा यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण अभियानांतर्गत जननी सुरक्षा योजना सन २००५-२००६ पासून राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत शासकीय आरोग्य संस्थेत किंवा जननी सुरक्षा योजनेकरीता मानांकित करण्यात आलेल्या खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुती झाल्यास पात्र महिलांना लाभ देण्यात येतो. सुरवातील या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना लाभ देण्यात येत होता. आता शहरी भागातील महिलांना सुध्दा लाभ देण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखाली तसेच अनुसुचीत जाती व अनुसुचित जमाती मधील गर्भवती मातांनाही लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे गरजुंना या योजनेचा आधार होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून दर महिन्याला होणाऱ्या आरोग्य समितीच्या सभेमध्ये जननी सुरक्षा योजनेचा आढावा घेण्यात येतो. या योजनेचा लाभ जास्तीत जासत पात्र लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी आरोग्य विभागांनी प्रयत्न करावे अशा सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिल्या आहे.

जननी सुरक्षा योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील सर्व गर्भवती माता, दारिद्रय रेषेखालील नसलेल्या अनुसुचित जाती मधील सर्व गर्भवती माता, दारिद्रय रेषेखालील नसलेल्या अनुसुचीत जमातीमधील सर्व गर्भवती माता



देण्यात येतो.

अर्ज कुठे करायचा - सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, नगर पालिका रुग्णालय, शासनमान्य खाजगी रुग्णालयात लाभ देण्यात येतो. या योजनेच्या माहितीकरीता गावातील आशास्वंयसेविका यांचेशी संपर्क करण्यात यावा.

जननी सुरक्षा योजनेकरीता लागणारे कागदपत्रे - बँक पासबुकला संलग्ण असलेले आधारकार्ड, शिधापत्रिका बीपीएल प्रमाणपत्र, फोटोसह बँकपासबुक

लाभ किती मिळतो - शहरी भागातील गर्भवती महिलांना प्रसुती झाल्यानंतर ६०० रुपये, ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना प्रसुती झाल्यानंतर ७०० रुपये, घरी प्रसुतीकरीता ५०० रुपये, सिझेरीयन करीता १ हजार ५०० रुपये बँक खात्यात थेट जमा करण्यात येते.

जिल्ह्यातील जननी सुरक्षा योजनेचे लाभार्थी - वर्धा जिल्ह्यात नोव्हेंबर २०२४ पर्यंत अनुसुचित जाती मधील एकुण १ हजार २०४ लाभार्थीपैकी १ हजार २४ लाभार्थ्यांना, अनुसुचित जमाती मधील १ हजार १८३ लाभार्थी पैकी ८७४ लाभार्थींना, दारिद्रय रेषेखालील ९५३ लाभार्थी पैकी ७०० लाभार्थींना तसेच सिझेरीयन झालेल्या १६ गर्भवती मातांना लाभ देण्यात आला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणा-या जननी सुरक्षा योजनेचा लाभ गरजुपर्यंत पोहचविण्याकरीता आरोग्य कर्मचा-यांनी सर्वोतपरी प्रयत्न करावे व जास्तीत जास्त पात्र लाभार्थीना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरीब जनतेला यामुळे आधार मिळेल व आरोग्याची देखील व्यवस्थीत काळजी घेतल्या जात आहे.

डॉ. रा.ज.पराडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

व्यायामशाळेत अल्पवयीनावर अत्याचार करणाऱ्या तरुणाला २० वर्ष सक्तमजुरी

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : व्यायामशाळेत अल्पवयीनावर अत्याचार करणाऱ्या तरुणाला खेड येथील विशेष न्यायालयाने २० वर्ष सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा विशेष न्यायाधीश एस. पी. पोळ यांनी सुनावली. याप्रकरणात शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे वय ३० वर्ष आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध जुन्नर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ (अनैसर्गिक अत्याचार) आणि लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पीडित मुलाच्या आईने तक्रार दिली होती. १ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी पीडित मुलगा व्यायामशाळेत गेला होता. तो व्यायाम करत होता. त्यावेळी आरोपीने त्याच्यावर व्यायामशाळेत अनैसर्गिक अत्याचार केले. आरोपीच्या तावडीतून मुलाने सुटका केली. घाबरलेल्या मुलाने या घटनेची माहिती आईला दिली. त्यानंतर आईने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक वाय. वाय. पाटील यांनी याप्रकरणाचा तपास करुन आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले.

या खटल्यात विशेष सरकारी वकील विकास देशपांडे यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. खटल्यात पीडित मुलाची साक्ष महत्त्वाची ठरली. पीडित मुलगा अल्पवयीन आहे. त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करण्यात आले. आरोपीला कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी विनंती विशेष सरकारी वकील विकास देशपांडे यांनी युक्तिवादात केली. न्यायालयने युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीला शिक्षा सुनावली. आरोपीकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी, तसेच नुकसान भरपाईपोटी पीडित मुलाला देण्यात यावी, असे न्यायालायने निकालात नमूद केले आहे.

संपादकीय...

शेजारसौख्याची शालीनता

...या आरोपांवर तातडीने प्रतिक्रिया देण्याची गरज नसल्याचे मान्य केले तरी, कृतीतून प्रत्युत्तर द्यावे लागेल. मालदीवमधील सरकार उलथण्याचा, तसेच पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या हत्या घडवण्याचा कथित कट भारताने आखल्याचे आरोप कुणा सरकारने केलेले नाहीत. मालदीवमध्ये लोकनियुक्त सरकार उलथून लावण्यासाठी भारताने तेथील विरोधी पक्षीयांना निधीपुरवठा करण्याची योजना आखली होती, असा गंभीर आरोप 'द वॉशिंग्टन पोस्ट' या अमेरिकेतील पत्राने केला असून, तूर्त तरी त्याची दखल घेण्याची किंवा या वृत्ताचे खंडन करण्याची गरज भारताला भासलेली दिसत नाही. काही वदंतांना दुरूनच दुर्लक्षावे, हे धोरण त्यामागे असेल. ते योग्यच. आरोप गंभीर आहे. पण तो कोण्या देशाच्या सरकारचा नाही, तर माध्यमांकडून झाला आहे. अमेरिका, ब्रिटनस्थित माध्यमांचा आमच्याविरुद्ध आकस आहे हे एकदा धरून चालले, की प्रतिवादाचे प्रयोजन उरत नाही. शिवाय ज्या विरोधकांचा उल्लेख प्रस्तुत वृत्तात आहे, त्या कटाच्या एका 'सहनायकाने'च हे वृत्त तथ्यहीन असून भारत असे कधीही करणार नाही, असे सांगून टाकले आहे. शेजारी देशांशी संबंधांच्या बाबतीत भारतीय परिप्रेक्ष्यात शाश्वत आणि स्थिर असे काही नसते. सगळेच देश नवथर स्वतंत्र. तरी जवळपास एकातही लोकशाहीची पाळेमुळे म्हणावी तशी आणि तितकी रुजलीच नाहीत. तशात आर्थिक विषमता. बहुतेक ठिकाणी देशास खासगी मालमत्ता समजणारे सरंजामी नेतृत्व. त्यामुळे वांशिक आणि धार्मिक तेढ पाचवीला पुजलेली. स्थायी वैरभाव म्हणून पाकिस्तानचा अपवाद म्हणावा, तर त्या देशाबरोबरही शांतता स्थापनेच्या शक्यतांची उघडझाप सुरूच असते. मालदीव, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ या देशांमध्ये गेल्या १८ महिन्यांमध्ये सत्तांतर झाले. यांपैकी बांगलादेशातील भारतमित्र शासक शेख हसीना यांना जनतेच्या प्रक्षोभामुळे देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. मालदीवमध्ये मोहम्मद मुईझ्झू हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत जिंकले. त्यांनी प्रचारामध्ये भारतविरोधी भूमिका जाहीरपणे घेतली होती. भारतीय सैन्यदलांची मालदीवमधील माफक उपस्थितीही त्यांना नकोशी झाली होती. अध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी प्रथम तुर्की आणि नंतर चीनला भेटी दिल्या. दोन्ही देशांशी भारताचे फारसे सख्य त्या वेळी तरी नव्हते. श्रीलंकेमध्ये अनुरा दिस्सानायके हे कम्युनिस्ट नेते अध्यक्षीय निवडणूक जिंकले. तर नेपाळमध्ये के. पी. शर्मा ओली हे पुन्हा एकदा पंतप्रधानपदी विराजमान आहेत. त्यांना चीनशी जवळीक अधिक लाभदायी वाटते. आता यांतील मालदीवच्या म्हणजे अर्थातच मुईझ्झूंच्या भूमिकेत गेल्या चार महिन्यांत लक्षणीय बदल झाला आहे. त्यांच्या भारतभेटी वाढल्या आहेत, भारताचे महत्त्व अलीकडे ते वरचेवर वदू लागले आहेत. लक्षद्वीप बेटाची पर्यटनमहती वाढावी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथे मध्यंतरी भेट दिली होती. तो 'बाण' वर्मी लागला असावा, कारण या कृतीतून मालदीवमधील पर्यटकांचा ओढा आटला. पर्यटन हाच प्राणवायू असलेल्या चिमुकल्या कर्जबाजारी मालदीवला हे परवडणारे नाही हे मुईझ्झूंनी ओळखले आणि भारताशी संबंध नव्याने सुस्थितीत आणण्याबाबत त्यांची धावपळ सुरू झाली. हे सगळे सुरू असतानाच, 'द वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये भारताला संशयात गोवणारे वृत्त प्रसिद्ध व्हावे, यामागे निव्वळ योगायोग असण्याची शक्यता कमी. हे पत्र नक्की काय दावा करते? सन २०२३च्या अखेरच्या टप्प्यात मुईझ्झू अध्यक्षपदावर निवडून आले आणि त्यांनी उघडपणे भारतास आव्हान देण्याची भूमिका घेतली. 'द वॉशिंग्टन पोस्ट'च्या मते जानेवारी २०२४ मध्ये 'रिसर्च अँड ॲनालिसिस विंग' अर्थात 'रॉ' या भारतीय गुप्तचर संस्थेने मालदीवमधील मुईझ्झूंच्या विरोधकांना हाताशी धरून एक योजना आखली. 'डेमॉक्रेटिक रिन्यूअल इनिशिएटिव्ह' नामक या योजनेअंतर्गत मालदीव पार्लमेंटमधील ४० सदस्यांना लाच देऊन त्यांच्यामार्फत मुईझ्झूंच्या विरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याचे घाटत होते. या ४० जणांमध्ये विरोधकच नव्हे, तर मुईझ्झू यांच्या पक्षातीलही काही होते. याशिवाय पोलीस, लष्कर आणि समाजकंटक टोळ्यांच्या म्होरक्यांनाही निधीवाटप केले जाणार होते, म्हणे. पण अनेक महिने वाटाघाटी केल्यानंतरही पुरेसे सदस्य राजी झाले नाहीत, त्यामुळे योजना बारगळली असे या वृत्तात म्हटले आहे. यावर मालदीवमधील प्रमुख विरोधी पक्षाचे नेते आणि माजी अध्यक्ष, भारतमित्र मोहम्मद नशीद यांनी ठामपणे भारताची बाजू घेतली. आमच्यापर्यंत असा कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि भारत अशा प्रकारे एखाद्या देशातील लोकशाही सरकार अस्थिर करण्याची चूक कधीही करणार नाही इतक्या निःसंदिग्ध शब्दांत नशीद यांनी या वृत्ताचे खंडन केले. भारताने बुधवार सायंकाळपर्यंत तरी या दाव्यावर थेट प्रतिक्रिया देण्याचे टाळले. तरी या आरोपांचे पडसाद उमटू शकतात आणि भविष्यात त्यांची दखल घ्यावी लागू शकते. अमेरिकेतील याच पत्राने आणखी एका वृत्तलेखात 'रॉ'च्या पाकिस्तानातील कथित कारवायांविषयी सविस्तर विवेचन केले आहे. फुटकळ मारेकरी हाताशी धरून पाकिस्तानात वावरणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर किंवा भारताकडून दहशतवादी म्हणून घोषित झालेल्या काहींच्या हत्या घडवण्यात आल्या, असे यात म्हटले आहे. मोदींच्या दुसऱ्या कार्यकाळात म्हणजे २०१९ नंतर या प्रकारांत वाढ झाली, असेही 'द वॉशिंग्टन पोस्ट' म्हणते. या घटनांची संगती पुढे पन्नू-निज्जर हल्ल्यांशी लावली जाते. पाकिस्तानात जे जमले, ते अमेरिका, कॅनडामध्ये जमेलच असे नाही, असेही नमूद आहे. मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या संदर्भात केलेली 'घरात घुसून मारण्या'विषयीची विधाने प्रस्तुत वृत्तलेखात एकाच सूत्रात गुंफण्यात आली आहेत. एका बऱ्याचशा अविकसित किंवा अर्धविकसित टापूमध्ये आकाराने सर्वांत मोठ्या असलेल्या, लोकशाही टिकवून ठेवलेल्या, अजस्रा बाजारपेठ आणि कुशल मनुष्यबळ विकसित झालेल्या देशाचे अस्तित्व इतरांसाठी दखलपात्र असणारच. या इतर देशांमधील विविध उपक्रमांमध्ये भारतासारख्या क्षेत्रीय महासत्तेचा सहभागही असणारच. हा 'सहभाग' म्हणजे 'हस्तक्षेप' ठरवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत आणि इच्छा असो वा नसो, पण त्यांची दखल आपल्याला घ्यावी लागणार आहे. कॅनडा, अमेरिकेपाठोपाठ तिसऱ्या देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप भारतावर झाला. आधीच्या दोन प्रकारांमध्ये तेथील सरकारांनी प्रथितयश आणि विश्वासार्ह माध्यमांची दखल घेऊन पुढील कार्यवाही सुरू केली होती, हे विशेष उल्लेखनीय. मालदीवबाबतच्या वृत्तात तथ्य नाही, असे मानले तरी भारताला याबाबत काही तरी भूमिका घ्यावी लागेल. परदेशी माध्यमे आपल्या 'वाईटावर' आहेत असे खुशाल मानूनच सावधगिरी बाळगली पाहिजे. परदेशात खून घडवून आणण्याचे भारताचे धोरण नाही, असे परराष्ट्र खात्याने वेळोवेळी स्पष्ट केलेले आहे. तरीदेखील निज्जरचे भूत अजूनही आपल्या मानगुटीवरून उतरलेले नाही आणि पन्नू हत्या कटातून आपली सोडवणूक झालेली नाही. त्यात आता हे मालदीवचे प्रकरण. दुसऱ्या देशात जाऊन हत्यासत्रे, कटकारस्थाने रचण्याचे प्रकार अमेरिका, रशिया, इस्रायल, इराण हे देश करत आले आहेत. त्यातून सावरण्यासाठी आवश्यक चतुराई, मुजोरी किंवा आंतरराष्ट्रीय पाठबळ या देशांकडे होते. ते जेव्हा आटते, त्या वेळी काय होते हे समजून घेण्यासाठी विस्कळीत, विदग्ध इराणचे उदाहरण पुरेसे आहे. त्या मार्गाने जाण्याची भारताला अजिबात गरज नाही, हे 'लोकसत्ता'ने वेळोवेळी मांडले आहे. असले विकतचे बाहुस्फुरण घेऊन वावरणे यालाच सामर्थ्य समजणाऱ्यांची संख्या आपल्याकडे वाढताना दिसते. तथापि मालदीवमध्ये कोणताही कट न करता आज तो आपल्या मागे आला, हे उदाहरण पुरेसे निदर्शक आहे. भारताची ताकद कट-कपटात नाही, तर शाश्वत, शांततामय सहअस्तित्वात आहे. ते पथ्य आपण पाळू, तोपर्यंत आपला आवाज आहे नि त्याला 'वजन' आहे. शेजारसौख्यातली शालीनता पाहूनच आपले बहुतेक शेजारी चीनच्या नादी लागूनही परत आपल्याकडे येतात, हे असंख्य वेळा दिसून आले आहे. शेजाऱ्यांशी कसे वागू नये हे उदाहरण चीनच्या रूपात सहज उपलब्ध असताना त्यावरून काही न शिकणे योग्य नाही.

!!!! पुण्येचा भिडे वाडा: मुलींची आद्य शाळा !!!!

(सावित्रीमाई फुले जयंती व महिला मुक्ती दिन विशेष)



सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि. ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

'विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन?'

म. जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षाच्या होत्या.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वतः शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि. १ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि. १ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

'इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे?
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे?
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।'

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

'काळरात्र गेली। अज्ञान पळाले?
सर्वे जागे केले। सूर्याने या?
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य?
तेजस्वी अपूर्व। उगवला?'

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी 'धर्म बुडाला. जग बुडणार' अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

'स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!
त्यांची गोड वाणी मनी घुमे!!
महार मांगाची करते मी सेवा!
आवडीच्या देवा स्मरूनिया!!'

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म. फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

'बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।'

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का?

प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि. १० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

!! जयंती निमित्त सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!

सावित्रीबाई...

भिडेवाड्यात आता
होईलराष्ट्रीयस्मारक
सावित्रीबाईंचे कार्य
पिढ्यास उर्जाप्रेरक

शिक्षण ज्योत
लावी
समाजास
उपकारक
महिलाकेली शिक्षीत
अवघ्या घरा तारक

पहिलीमहिला शाळा
धोरण असे उध्दारक
जनसेवा मनगटावरी
बांधला सबल दोरक

सदैव सोसला संघर्ष
वाटे कैक गतिरोधक
अज्ञानअंधार घालवे
निर्मीला सत्यशोधक

पाऊलखुणा पाहता
उत्सुक हो संशोधक
जाणता फुलेदांपत्या
दिसे दिशा उद्बोधक

सावित्रीमाईचे स्मरण
इतिहासां मार्ग दर्शक
लेखणी लढा जाणता
अंचबीत होती दर्शक

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

क्रांतीज्योती...

निवांतपणे
ऐकता
सावित्री फुले कथा
जीवन सार कळूनि
साध्य होई सर्वथा

त्या काळीही त्यांना
कळे समाज व्यथा
अंधश्रध्दा शृढरूढी
पायी शृंखला प्रथा

गांजलेली नारीजात
विधवा न् परित्यक्ता
शाळेची कवाडे बंद
नारी भटके विमुक्ता

सावकारी छळवाद
शृंखलाबध्द अशक्ता
मंदीर प्रवेश बंदिस्त
दलीत समाज भक्ता

उच्च नीच भेद भाव
छळे दुर्बला व्यवस्था
समाज मना व्यापली
शिक्षणाची अनास्था

तेधवा क्रांती ज्योती
साथ प्राप्ती अनाथा
इतिहास गाई गोडवे
ध्यानात ठेवी सर्वथा

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

माळेगाव यात्रेची श्रीमंती व परंपरेला राजाश्रय मिळवण्यासाठी वचनबद्ध : आ. प्रताप पाटील चिखलीकर

माळेगावच्या यात्रेला शासनाच्या विविध कार्यक्रमाने आली रंगत

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : राष्ट्रीय दुखवट्यामुळे लांबणीवर गेलेल्या माळेगाव यात्रेच्या शासकीय कार्यक्रमाला दि २ जानेवारी पासून थाटात सुरुवात झाली. विविध कार्यक्रमांचे नीटनेटके आयोजन करून यात्रेला आलेल्या लाखोंच्या समुदायाला खिळवून ठेवण्याचे कार्य नांदेड जिल्हा परिषद, लोहा पंचायत समिती व माळेगाव ग्रामपंचायतीने पार पाडले.

प्रशासनामार्फत ५ जानेवारीपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . हजारो पर्यटकांनी श्रद्धाळूंनी आणि यात्रेकरूंनी श्री. क्षेत्र खंडोबाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. यात्रेमध्ये सर्व वयोगटातील नागरिकांच्या मनोरंजनासाठी करमणुकीची साधने उपलब्ध आहेत. तसेच खरेदी करण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंपासून तर बाळ गोपाळांच्या खेळण्याच्या साहित्याची रेलचेल आहे. थंडीपासून बचाव करणारे बिछान्याचे साहित्य कपडे याची प्रचंड मोठी दुकाने यात्रेत आली असून पशूंचा बाजार लक्षवेधी आहे. शेकडो वर्षाच्या आयोजनाची परंपरा असलेल्या या यात्रेला मोठ्या संख्येने भेट देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

५ जानेवारीला पशुस्पर्धांचा निकाल

दिनांक २ जानेवारीला पशुप्रदर्शन स्पर्धेत कधी न बघितलेली अशा विविध प्रजातीचे अश्व, श्वान, वळू, कुक्कुट यांची देशातील विविध भागातून आलेली विविधता हजारोची नजर वेधून घेत होती. पशुप्रदर्शन स्पर्धा सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती. या पशुप्रदर्शनीचा निकाल ५ जानेवारीला वृत्तपत्रातून घोषित केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, यात्रेच्या सचिव उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, लातूर विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहायुक्त डॉ नाना सोनवणे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, उदगीरचे पशुवैद्यकिय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता नंदकुमार गायकवाड, नांदेडचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पडीले, यातिन पुजारी, हिंगोलीचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त एस. बी. खुणे, लातूरचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त श्रीधर शिंदे यांची उपस्थिती होती.

कृषी प्रदर्शन थाटात संपन्न

नांदेड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत आयोजित कृषी प्रदर्शन व सत्कार समारंभाचे थाटात आयोजन करण्यात आले. फळे, भाजीपाला, मसाला प्रदर्शनातील दर्जेदार व जिल्ह्यातील शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सत्कार सोहळा स्मरणीय ठरला या कार्यक्रमामध्ये डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, सीईओ संदीप माळोदे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सचिन कपाले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, राजकुमार मुक्कावार , समाज कल्याण अधिकारी सत्येंद आवूलवार, यात्रेच्या सचिव उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, कृषी विभागाचे विविध मान्यवर अधिकारी व माजी पदाधिकारी तसेच शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेच्या निमित्याने जिल्हा परिषद प्रशासनामार्फत हा एक मोठा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो.

लावणी महोत्सवाला हजारोंची उपस्थिती

सायंकाळी महाराष्ट्रातील नामवंत नऊ संचांकडून सादर झालेल्या लावणी नृत्याने माळेगावात यात्रेसाठी आलेल्या यात्रेकरूना वेड लावले. महोत्सवात संचामध्ये आशा रूपा परभणीकर मोडनिंब, शामल स्नेहा लखनगावकर मोडनिंब, आकांक्षा कुंभार प्रस्तुत मराठमोळा- नादखुळा, प्रिया पाटील सोलापुर प्रस्तुत झंकार घुंगराचा, योगेश देशमुख पुणे प्रस्तुत तुमच्यासाठी कायपण, श्रुती मुंबईकर प्रस्तुत लावण्यवतीचा जलवा या संचाने सादरीकरण केले. विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्यातील अनुराधा नांदेडकर व स्वर सरगम कलासंच माळाकोळी या दोन कला संचांनीही आपली दमदार उपस्थिती नोंदविली.

माळेगावसाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

आजच्या सर्व शासकीय कार्यक्रमाचे उद्घाटन कंधार लोहा मतदार संघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते झाले. माळेगावच्या यात्रेची श्रीमंती वाढविण्यासाठी व परंपरा जोपासण्यासाठी थेट मुख्यमंत्र्यांना प्रसंगी साकडे घालू असे आश्वासन यावेळी त्यांनी हजारोंच्या जनसमुदायाला दिले. जिल्हा परिषदेचे सभापती असतानाच्या काळापासून या यात्रेच्या परंपरेची व इथल्या लोककलेशी आपण जोडल्या गेलो आहोत त्यामुळे लागणारा खर्च व या संस्कृतीची जोपासना कर.

संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

लाभार्थ्यांचा लाभ डीबीटी द्वारे थेट खात्या जमा होणार; अंतिम मुदत १५ जानेवारी

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील देवळी तालुक्यातील लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी २०२५ पासुन अनुदान अर्थसहाय्य केवळ डीबीटी पोर्टल द्वारे थेट खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी आपले आवश्यक कागदपत्रे दि. १५ जानेवारी २०२५ पर्यंत तहसिल कार्यालयाच्या संजय गांधी निराधार योजना शाखेत जमा करावी, असे आवाहन देवळी तहसिलदार समर्थ क्षिरसागर यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डि.बी.टी. (ऊँऊ) पोर्टलव्दारे करण्यात येणार आहे. सदर योजनेतील लाभार्थ्यांची विहीत विवरणपत्रात माहिती भरुन डि.बी.टी. (ऊँऊ) पोर्टलवर अपलोड करुन वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांचे सर्व लाभ तातडीने डी.बी.टी. मार्फत लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा करण्याच्या मुख्य सचिवांनी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार जिल्हास्तरावरुन डि.बी.टी पोर्टलवर ऑन बोर्ड (आधार व्हॅलीडेट झालेल्या व आधार व्हॅलीडेट न झालेल्या) लाभार्थ्यांना माहे डिसेंबर -२०२४ व जानेवारी -२०२५ चे अर्थ सहाय्य डि.बी.टी. (ऊँऊ) पोर्टल मार्फत देण्यात येणार आहे. तसेच ऑन बोर्ड नसलेल्या लाभार्थ्यांना पुर्वीच्याच पारंपारीक पध्दतीने (बिम्स प्रणालीव्दारे) अर्थसहाय्य वितरीत करण्यात येईल. बिम्स प्रणालीव्दारे अर्थसहाय्य वितरणाची सुविधा ही फक्त माहे जानेवारी -२०२५ अखेरपर्यंत उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

त्यानंतर संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रायणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी-२०२५ पासूनचे अनुदान अर्थसहाय्य केवळ डी.बी.टी. (ऊँऊ) पोर्टलवर ऑन बोर्ड आधार व्हॅलीडेट झालेल्या लाभार्थ्यांनाच करण्यात येणार आहे. तर उर्वरीत ऑन बोर्ड आधार व्हॅलीडेट नसलेल्या तसेच डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी न झालेल्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य माहे फेब्रुवारी-२०२५ पासुन वितरीत करणे शक्य होणार नाही.

यासाठी सर्व लाभार्थ्यांनी आपले अद्यावत आधारकार्ड, बँक खाते, आधार व बँक खात्याशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक, अपंग प्रमाणपत्र तसेच जीवन प्रमाणपत्र इत्यादी ची छायाप्रत दिनांक १५ जानेवारी २०२५ पर्यंत संजय गांधी निराधार योजना शाखेत सादर करावी. अन्यथा आपल्या संपुर्ण माहितीची ऑनलाईन डी.बी.टी. पोर्टलमध्ये नोंद घेता येणार नाही. सदर नोंद न झाल्यास संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेचा लाभ बँक खात्यावर शासनाकडुन जमा करणे शक्य होणार नाही. तसेच याबाबत नंतर लाभार्थ्यांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची राहील, असे तहसिलदार देवळी यांनी कळविले आहे.

नवं वर्ष, नवे संकल्प, शरीर आणि मनाच्या आरोग्याची घ्या काळजी

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



पुणे वाघोली : नवीन वर्षाच्या तुम्हाला शुभेच्छा..नवीन वर्षानिमित्तानं अनेक जण नवीन संकल्प करत असतात. तुम्हीही कोणता संकल्प करत असाल तर त्यात शरीर आणि मानसिक आरोग्याकडेही लक्ष द्या. २०२५ या नवीन वर्षाची चांगली सुरुवात करण्यासाठी संतुलित, निरोगी आणि यशस्वी होण्यासाठी आरोग्याची काळजी घेणं आणि वेळेचं व्यवस्थापन करणं सगळ्यात महत्त्वाचं. त्यामुळे नवीन वर्षाची सुरुवात सकारात्मकतेनं करा.

१. संतुलित आहाराची सवय लावा.

२०२५ वर्षाची सुरुवात सकस आहारानं करा. आहारात ताजी फळं, भाज्या, प्रथिनं आणि फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करा. प्रक्रिया केलेले आणि जास्त कॅलरी असलेले पदार्थ खाणं टाळा. संतुलित आहारामुळे तुमचं शारीरिक आरोग्य तर सुधारतंच पण मानसिक स्थितीतीही मजबूत राहते.

२. तुमच्या दिनक्रमात व्यायामाचा समावेश करा.

व्यायामाशिवाय निरोगी जीवन शक्य नाही. दररोज ३० मिनिटं व्यायाम करा. योगाभ्यास, व्यायामशाळा, धावणं असो किंवा वेगानं चालणं असो. यामुळे तुमचं शारीरिक आरोग्य तर सुधारेलच पण तणाव कमी होण्यास आणि मानसिक स्थिती सुधारण्यासही मदत होईल.

३. मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक स्थितीकडेही लक्ष दिलं पाहिजे. ध्यान, प्राणायाम आणि सकारात्मक विचार हे मानसिक आरोग्यासाठी खूप महत्वाचं आहे. दररोज आराम करण्यासाठी थोडा वेळ द्या, जेणेकरून तुमची मानसिक स्थिती सुधारेल आणि तुम्ही आनंदी राहू शकाल.

४. झोपण्याच्या सवयी सुधारा.

झोप हा आपल्या आरोग्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. २०२५ मध्ये तुमचा प्रत्येक दिवस चांगला जावा असं तुम्हाला वाटत असेल, तर त्यासाठी पुरेशी झोप घेणं महत्त्वाचं आहे. निरोगी आयुष्यासाठी रोज रात्री ७-८ तासांची झोप घ्या. झोपेच्या कमतरतेमुळे मानसिक थकवा, चिंता आणि शारीरिक समस्या उद्भवू शकतात, ज्यामुळे तुमच्या दैनंदिन कामांमध्ये व्यत्यय येऊ शकतो.

५. वेळेचं व्यवस्थापन शिका.

नवीन वर्षात वेळेचं योग्य व्यवस्थापन केलं तर तुमचे जीवन खूप सोपं आणि व्यवस्थित राहू शकेल. दिवसभराच्या कामाचं योग्य नियोजन करा. कामाची यादी बनवा, त्यानुसार वेळेचं योग्य दिशेनं व्यवस्थापन करा.

६. नकारात्मकतेपासून दूर राहा.

नकारात्मक विचारांमुळे तुमची ऊर्जा वाया जाते आणि आत्मविश्वास कमकुवत होतो. स्वतःभोवती सकारात्मकता राखण्याचा प्रयत्न करा आणि कोंणत्याही कठीण परिस्थितीत आशा ठेवा आणि उपाय शोधा.

७. सामाजिक संबंध मजबूत करा.

कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवल्यानं तुमचं जीवन आनंदी राहतं. नवीन वर्षात नाती मजबूत करण्यासाठी वेळ काढा. तुमच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी हे फायदेशीर ठरेल.

तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात नवीन गोष्टी शिकण्याची आणखी एक संधी म्हणून २०२५ या नवीन वर्षाचा विचार करा. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्हाला पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल. तुमच्या करिअरसाठी नवीन भाषा असो, नवीन छंद असो किंवा नवीन कौशल्य असो, शिकण्याची प्रक्रिया तुम्हाला पुढे जाण्यास मदत करेल.

- डॉ पल्लवी मेहरे, वाघोली, पुणे.

शरीराला हायड्रेट ठेवणं खूप महत्वाचं आहे. जास्त पाणी प्यायल्यानं तुमची त्वचा आणि पचनसंस्था तर सुधारतेच पण त्यामुळे तुमच्या संपूर्ण शरीराला ऊर्जा मिळते आणि दिवसभराचा थकवा कमी होतो. दिवसातून ८-१० ग्लास पाणी पिण्याचा प्रयत्न करा.नवीन वर्षाच्या तुम्हाला शुभेच्छा !

- डॉ. मयुरा बेहळे, वाघोली, पुणे.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालयात सामूहिक वाचन

कंधार ■ संतोष कांबळे



कंधारः नगरपरिषद संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय कंधार येथे वाचनसंकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत मा.अनुष्का शर्मा प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद कंधार यांच्या मान्यतेने दिनांक १ जानेवारी रोजी बुधवारी वाचनालयास साप्ताहिक सुट्टी असतानाही सुट्टी रद्द करून सामूहिक वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी १२० विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविली.

तरुण पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. ही बाब लक्षात घेता राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर पुस्तकवाचनाच्या प्रवाहात आणण्याचा मानस राज्य सरकारने आखला आहे. १ जानेवारी रोजी नगरपरिषद संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय कंधार येथे अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यासह श्री गणपतराव मोरे विद्यालयाचे १२० विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविली. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मोहम्मद रफीक सत्तार स.ग्रंथपाल यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन कार्यक्रमा विषयी माहिती दिली. तसेच गव्हाणे पी.एन., शेख एन.बी., यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी श्री गणपतराव मोरे विद्यालयाचे शिक्षक कामजळगे आर.एस., सौ.ठाकूर एस.व्ही. उपस्थित होते. मोठ्या संख्येत वाचक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मिलिंद वसंतराव महाराज, कमलबाई शिवाजीराव जाधव, वंदना संजय फुले यांनी परिश्रम घेतले.

गरुडझेप संस्थेचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी

लोणी धामणी ■ कैलास गायकवाड



लोणी धामणी : मंचर ता. आंबेगाव जि. येथील गरुड झेप बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मंचर नगर पंचायत सभागृहात पार पडले. संस्थेची स्थापना २००७ साली होऊन गेल्या अठरा वर्षात संस्थेने अनेक समाजप्रयोगी उपक्रम राबवलेले आहेत .यावेळी प्रमुख पाहुणे मंचर नगरपंचायतचे मुख्या. गोविंद जाधव ,रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य उदय शिवाजीराव पाटील, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे उपाध्यक्ष बाळासाहेब बाणखेले, मंचरचे माजी आदर्श सरपंच दत्ता गांजाळे ,लाला बँकेचे चेअरमन युवराज बाणखेले, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष प्रशांत बागल, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब खानदेशे, धर्मवीर संभाजी पतसंस्थेचे चेअरमन सिताराम लोंढे, खरेदी विक्री संघाचे संचालक अरुण लोंढे, माजी सरपंच कैलास गांजाळे,माजी ग्रामपंचायत सदस्य अरुण बाणखेले , शरदराव शिंदे, उत्तमराव भेके, उद्योजक शेखर घुले, विशाल वाबळे, अमोल शेलार, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीगणेशाच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा.राजाराम बाणखेले म्हणाले की, गरुडझेप संस्थेचे कार्य निश्चित समाजाला प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणार आहे. संस्थेने शिक्षण आरोग्य पर्यावरणाला केंद्रबिंदू मानून उपक्रम राबविले आहे .संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते गणेश खानदेशे व ?ड. कुणाल बाणखेले यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकारिणीचे काम चांगले असल्याने समाज त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. संस्थेने तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये सुवर्णप्राश ड्रॉप, रक्तगट, हिमोग्लोबिन, दंत व बालरोग तपासणी शिबिर घेतले आहे. तालुक्यात मधुमेह व उच्च रक्तदाब तपासणी शिबिर, वृक्षारोपण, रुग्णांना फळेवाटप,अनाथ मुलांना मदत, विविध स्पर्धांचे आयोजन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, महिला सबलीकरण मेळावा, विविध क्षेत्रात कार्य केलेल्या व्यक्तींच्या गुणगौरव असे मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबवले आहेत. त्यामुळे संस्थेचा निश्चितच पुणे जिल्ह्यात नावलौकिक आहे.

यावेळी गरुडझेप बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, गणेश खानदेशे, मंचर नगरपंचायतचे मुख्याधिकारी गोविंद जाधव रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य उदय शिवाजीराव पाटील पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उपाध्यक्ष बाळासाहेब बाणखेले, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब खानदेशे यांची भाषणे झाली.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरुडझेप दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.याप्रसंगी संग्राम सावंत, हर्षवर्धन खानदेशे, गणेश वायाळ,सालीम इनामदार, संजय चिंचपुरे, रामदास बढे, ज्ञानेश्वर खानदेशे गुरुजी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी गरुडझेप संस्थेचे सचिव ?ड.कुणालआप्पा बाणखेले, संचालक तुषार थोरात, जालिंदर जाधव, ओंकार मुळे, जितेंद्र पोखरकर, मिलिंद बाणखेले, ?ड. सुदाम मोरडे,कालिदास गांजाळे, प्रतीक थोरात भक्ते आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन येथून पांचाळ यांनी केले तर शेवटी सर्वांचे आभार संस्थेचे सचिव ?ड.कुणाल बाणखेले यांनी मानले.

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ मंदा चौरे यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

दै, जनप्रभात रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती : बाभूळसर खुर्द शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ मंदा चोरे यांना सुवर्णमुद्रिका देऊन सन्मानित करण्यात आले.आज बाभूळसर खुर्द शाळेतील सौ मंदा अनाजी चोरे आज सेवानिवृत्त झाल्या. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद यांच्या तर्फे सुवर्णमुद्रिका साडी, व त्यांचे पती श्री अनाजी चोरे सरांना पूर्ण पोशाख देऊन सन्मानित करण्यात आले..

सौ मंदा चोरे मॅडम यांनी डोंगरगण, पिंपरखेड, रामलिंग, दसगुडे मळा, राजुरी, मुंजाळवाडी, आमदाबाद, बाभूळसर खुर्द या ठिकाणी जवळ जवळ ३७वर्ष नोकरीं केली. त्यांनी प्रत्येक शाळेत तन मन लावून उत्कृष्ट प्रकारे अध्यापन करून खूप विद्यार्थी घडवले.असंख्य विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर केले. त्यांची एक मुलगी शिक्षिका असून, दुसरी मुलगी आय टी इंजिनियर आहे. तसेच चिरंजीव उच्च शिक्षितआहे .कार्यक्रमासाठी आज बाभूळसर शाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, श्री. भैरवनाथ सैनिक संघटना, चेअरमन वि. का, सोसायटी, कारेगाव केंद्रातील शिक्षक, ग्रामस्थ, महिला, पालक उपस्थित होते, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गोरक्ष डाळिंबकरं (अध्यक्ष शाळा व्य. समिती) हे होते, सूत्रसंचालन श्री संतोष लगड सरांनी केले. व आभार श्री. विकास शिंदे अध्यक्ष लहुजी संघटना यांनी मानले.

पवार महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

परभणी ■ अरविंद कांबळे



पूर्णा (जं) : येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाचा दिनांक ०१ जानेवारी २०२५ वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी सार्वजनिक वाचनालय ,पूर्णा व स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल गिरधारी कदम, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.विलास काळे , ग्रंथालय व माहितीशास्त्रीय विभागाचे प्रा.डॉ.अशोक कोलंबीकर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.दत्ता पवार, महाविद्यालयातील प्राध्यापक ,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी पुस्तक वाचन व लेखन याचे महत्त्व पटवून देत असताना वेगवेगळ्या विषयाचे ग्रंथ विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे त्यावर टिपण काढले पाहिजे यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल गिरधारी कदम यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संजय कसाब यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ.विलास काळे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोणीच्या सम्यक मित्र मंडळाच्या वतीने अन्नदान



लोणी धामणी ■ कैलास गायकवाड

लोणी धामणीः पेरणे ता. हवेली जि. पुणे येथील विजय स्तंभास मानवंदना देण्यास येणाऱ्या लोकांसाठी येथील सम्यक मित्र मंडळाच्या वतीने अन्नदान करण्यात आले. सम्यक मित्र मंडळाच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. वृक्षारोपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व पुण्यतिथी रक्तदान शिबिर, संविधान जनजागृती इत्यादी कार्यक्रम सम्यक मित्र मंडळाच्या वतीने पार पाडले जातात. विजय स्तंभाला मानवंदना देण्यात येणाऱ्या लोकांसाठी यावेळी संमेक मित्र मंडळाच्या वतीने अंदाजे दोन हजार लोकांना अन्नदान करण्यात आले. यावेळी मंडळाचे खजिनदार सुरेंद्र सोनवणे, मार्गदर्शक दिगंबर सोनवणे, रमेश सोनवणे, नरदास म्हात्रे उत्तम खंडे, प्रवीण सोनवणे, वामन सोनवणे, आणि नितीन सोनवणे, हर्षद थोरात इत्यादी मंडळाचे कार्यकर्ते व सभासद हजर होते.

श्री स.भु. प्रशाला गोंदेगाव येथे परीक्षे संदर्भात विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



गोदेंगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेत दिनांक ऊें /ई्या स्पर्धा परीक्षांसाठीचे मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीप्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. योगेश इंगळे होते.तर प्रमुख शालेय समिती सदस्य शरद निकम, आबाराव चौधरी, पालकसंघाचे अध्यक्ष प्रविण वाघ, मुख्याध्यापक आर. एस. माळी,उपमुख्याध्यापक एस.आर. दाभाडे,पर्यवेक्षक जी. जी.ढाकणे होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक श्री स.भु. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.विनय पाटील व प्रा.ए.एस. काटकर होते. कार्यकमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.भागवत महालपुरे यांनी केले. मार्गदर्शक प्रा.विजय पाटील यांनी दहावी नंतर चे करीअर याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. श्री स.भु. शिक्षण संस्थेची भूमिका या विषयी विद्यार्थींना सखोल मार्गदर्शन केले.तसेच प्रा.काटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्याने आपले ध्येय निश्चित करा व त्या दिशेने वाटचाल करा असे आवाहन केले. डॉ.योगेश इंगळे यांनी श्री स.भु. शिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेत टिकुन रहावा यासाठी अल्पदरात या स्पर्धा परीक्षांच्या क्लासेसचेआयोजन केले आहे. ना नफा ना तोटा या तत्वावर हे क्लास संस्थेने सुरु केले. श्री स.भु. परिवारातील सर्व विद्यार्थांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन उपस्थित पालकांना केले. या मार्गदर्शनास एकूण ५० पालक व सर्व विद्यार्थीउपस्थित होते. वर्ग १० वी चे वर्गशिक्षक आर.एस.तायडे, पी.बी.चौधरी,एस.व्ही. खिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी. बी.पाटील यांनी केलेतर आभार पी.बी. चौधरी यांनी मानले.

श्री स.भु.आंतरशाखीय क्रीडा महोत्सवातील गोंदेगावच्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



श्री स.भु.शिक्षण संस्था छत्र.संभाजीनगर आयोजित स.भु.क्रीडा महोत्सव नुकताच पार पडला असून यामध्ये संस्थेच्या सर्व शाखांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. यामध्ये श्री स.भु.माध्य.व उच्च माध्य.विद्यालय गोंदेगावने विविध क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले आहे.

याप्रसंगी शालेय समिती अध्यक्ष डॉ.योगेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थानी शालेय समिती सदस्य सुधाकर महालपुरे,प्रमुख शालेय समिती सदस्य आबाराव चौधरी,.शरद निकम,पालक संघाचे अध्यक्ष प्रविण वाघ तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एस.माळी,उपमुख्याध्यापक.ए स.आर.दाभाडे, पर्यवेक्षक,जी.जी.ढाकणे,प्रा.बी.ई. महालपूरे,आर.बी.राठोड उपस्थित होते.या प्रसंगी मान.मुख्याध्यापक श्री माळी यांनी प्रास्ताविक केले.मैदानी क्रीडा प्रकारात २०० मीटर धावणे सुवर्णपदक हर्षल महाजन(८क)कांस्यपदक-कु.प्राची अहिरे(८ब) ८०० मीटर धावणे :-

सुवर्णपदक- गुणवंत निकम (८क) संग्राम देशमुख(९क)

कु.चैताली वाघ(८क) कांस्यपदक - कु.ऋतुजा राकडे(८क) गोळाफेक स्पर्धा - कांस्यपदक- ओम चौधरी (१०क) कुस्ती स्पर्धा-३५ किलो वजनगट सुवर्णपदक- गणेश अहिरे (८ब) ५० किलो वजनगट सुवर्णपदक- बाळासाहेब सुर्यवंशी(६ब

५५किलो वजनगट रजतपदक- संग्राम देशमुख(९क) श्रोण ठाकूर (७ब)सांघिक खेळप्रकार-व्हॉलीबॉल (१४ वर्ष वयोगट) सुवर्ण पदक- मुली व्हॉलीबॉल(१७ वर्ष वयोगट) कांस्यपदक- मुले कब्बडी-(१४ वर्षे वयोगट)

कांस्यपदक - मुले१४ पैकी सुवर्ण -७ रजत-२ कांस्य-५ असे जिंकलेल्या पदकांचे स्वरूप आहे.

स.भु. क्रीडा महोत्सवातील पदकविजेत्या खेळाडूंना कबड्डी खेळातील अर्जुन पुरस्कारप्राप्त अभिलाषा म्हात्रे, स.भु.संस्थेचे सरचिटणीस डॉ.श्रीरंग देशपांडे, उपाध्यक्ष बी.वाय.क्षीरसागर,सुनील देशपांडे,मिलिंद रानडे, ज्ञानप्रकाश मोदानी, प्राचार्य राव,साधना शहा, अनिल देशमुख आदींच्या प्रमुख उपस्थितीत विजयी ट्रॉफी,पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.सदरील विद्यार्थ्यांनाअध्यक्ष,सदस्य,मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक प्रशालेतील सर्व शिक्षक वृंद यांच्याद्वारे गौरविण्यात आले तसेच क्रीडाशिक्षक ए.ए.मोरे, ए.एस.पाटील,श्री राजू बिंदवाल,ए.आर.पाटील,ए.एस.वाघ ा,आर.बी.राठोड,एस.व्ही.खिरे यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी बी पाटील यांनी केले व आभार प्रा.बी ई महालपुरे यांनी मानले.

विदयार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण शिबिराच्या वेगवेगळ्या उपक्रमातून तयार होत : डॉ. के. राजकुमार

परभणी ■ अरविंद कांबळे

परभणीः पूर्णा : राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय विशेष शिबीराच्या निरोप समारंभ प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हटले कि कोणतेही काम कमी दर्जाचे न मानता मन लावून ते काम पूर्ण करणे, तसेच त्या बद्दल आदर दाखवणे म्हणजे श्रमप्रतिष्ठा होईल.आपल्या रोजच्या जीवनातील स्वतःची कामे स्वतः करणे, तसेच सामाजिक कार्यामध्ये सहभागी होणे. त्याचे महत्त्व इतरांना पटवून देणे स्वतःचे घर,परिसर, शाळा, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता बाळगणे आपल्या रोजच्या जीवनातील स्वतःची कामे स्वतः करण्याकडे भर देणे . त्याचबरोबर शिबिराच्या विविध उपक्रमातून राष्ट्रभक्ती हे मूल्य जोपासले पाहिजे सार्वजनिक ठिकाणी देशाच्या उन्नतीसाठी सतत आपल्याला कार्यरत राहणे अपेक्षित असते. तसेच देशाच्या संरक्षणासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे.अभ्यासा बरोबरच समाजसेवा करणे अतिशय महत्वाचे आहे. आपल्या सभोवताली असणाऱ्या समाजबांधवांना त्यात सहभागी करून घेणे, या माध्यमातून संस्कार घडवल्या जातात. शिबिराच्या वेगवेगळ्या कार्यातून विदयार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण सिद्ध होत असतात. व्यक्तीच्या जीवनामध्ये जीवन जगताना एक माणूस म्हणून खूप उपयोगी असते. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष मा.उत्तमराव कदम व सहसचिव मा. गोविंदराव कदम यांनी शिबीर यशस्वी पार पडल्या बद्दल शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. राजकुमार यांनी मुलांमध्ये नेतृत्व गुण राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये साध्य होण्यासाठी मदत होते विदयार्थ्यांनी सदाचार, नैतिकता, सभ्यता, सुसंस्कृतपणा इत्यादी गुणांची वाढ ही विशेष शिबिराच्या माध्यमातून मिळते आणि ते तुम्ही जोपासा व जीवन जगण्यासाठी त्याचा उपयोग करा असे मत व्यक्त करून शाळेच्या परिसरातील स्वयंसेवकांनी केलेली स्वछतेबद्दल कौतुक केले. श्री प्रताप बखाल यांनी स्वयंसेवकांनी केल्या कामाचे कौतुक केले. तसेच त्यांनी केलेल्या पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, तांत्रिक साक्षरता, मोबाईल पासून सावधगिरीने कसे व्यवहार करायचे ,स्वच्छता अभियान ,बालविवाह यांच्या विषयी गावाकऱ्यात केलेली जनजागृती यांचा समाजविकासाठी निश्चित फायदा होईल असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. शिवसांब कापसे,श्री प्रताप बखाल, श्री राम काळे,श्री पाटील, सूर्यवंशी मॅडम, बुक्तरे मॅडम,डॉ. गंगाधर कापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती . राष्ट्रीय सेवा योजनाच्या विशेष शिबिर गेल्या सात दिवसापासून कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्पा गंगासागर व डॉ.अजय कुऱ्हे यांनी सर्व कार्यक्रम नियोजित यशस्वी केले. या विशेष शिबिरास डॉ. सोमनाथ गुंजकर डॉ.ओंकार चिंचोले ,प्रा. बालाजी असोरे, डॉ. जयश्री स्वामी, डॉ. बगाटे, डॉ. शिंदे, श्री नागोराव साळवे,श्री गणेश सोळंके, बनसीलाल ठाकूर यांनी विशेष प्रयत्न केले.सात दिवशीय शिबीराचा आढावा डॉ. पुष्पा गंगासागर यांनी घेतला तर मनोगत कृष्णागीता, शुभांगी काकडे यांनी व्यक्त केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घनश्याम कदम यांनी केले तर पल्लवी काटकर यांनी आभार व्यक्त केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिकक्षेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी ;परभणीत शनिवारच्या मूक मोर्चातली प्रमुख मागणी

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : मस्सजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणाऱ्या घोषित फरार आरोपींना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी, या प्रमुख मागणीसाठी परभणीमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय आणि सर्वधर्मीय मूक मोर्चा काढण्यात येऊन तो जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहे.

शनिवार, दि. चार जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता, जिंतूर रस्त्यावरील नूतन महाविद्यालयापासून भव्य असा हा मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा महाराणा प्रताप चौक, शनी मंदिर, नानल पेठ कॉर्नर, छत्रपती शिवाजी चौक, गांधी पार्क, नारायण चाळमार्गे महात्मा फुले स्मारक ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकापर्यंत काढण्यात येणार आहे. या मोर्चात स्व. संतोष देशमुख यांचे कुटुंबीय त्याशिवाय मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार संदीप क्षीरसागर, ज्योतीताई मेटे व स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून परभणी जिल्हा प्रतिनिधी, खासदार, आमदार आदीजणांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार असल्याचे समजते आहे.

स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी गुरुवारी सर्वपक्षीय, सर्व समाज आणि अनेक संघटनांची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी स्व.देशमुख यांना सर्वांतफे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बीड जिल्ह्यातील आपल्या बांधवाला न्याय देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी, दहशत व जातीयवाद मोडीत काढण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, सदर मुक मोर्चात परभणी जिल्हाभरातील व तालुक्यातील सर्व जाती-धर्माच्या बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्ष संघटना, मित्र मंडळ, सकल मराठा समाज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सदर मूक मोर्चाच्या अनुषंगाने शहरात कोणताही अनुचित प्रकार घडला जाऊ नये, मोर्चा अगदी निर्विघ्नपणे पार पडला जावा, या आधीचा अनुभव घेत पूर्वलक्षी खबरदारीचा उपाय म्हणून शहरात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, यातील संशयित आरोपी वाल्मिकी कराड हा न्यायालयीन कोठडीत असला तरी यातील आणखी तीन प्रमुख आरोपींना नुकताच पोलिसांतर्फे फरार घोषित करण्यात आले आहे. मागील २५ दिवसांपासून आरोपींना मोकाट राहण्याची संधी मिळाल्यामुळेच कदाचित ते फरार झाले असावेत, असेही आता आरोप पुढे येत आहेत. अर्थात या सर्व दिरंगाईला शासन, का पोलीस प्रशासन पूर्णतः जबाबदार आहे, हे येणाऱ्या काळातच समजून येणार आहे. विधानसभेत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने या प्रकरणी एस आयटी स्थापित करण्यात आली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. त्याशिवाय सुप्रसिद्ध सरकारी वकील म्हणून शक्यतो उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

मंत्री मकरंद पाटील आणि आमदार सचिन पाटील यांचा मोर्वे येथे सत्काराचे आयोजन

खंडाळा ■ गणेश गुरव





खंडाळाः वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे जननायक आमदार तसेच महायुती सरकारमधील मदत व पुनर्वसन मंत्री श्री मकरंद आबा पाटील आणि फलटण विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार श्री सचिन पाटील यांचा फलटण व खंडाळा तालुका गुरव समाजाच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरव समाजाचे संत श्री काशीबा महाराज गुरव यांचा पुण्यतिथी सोहळा दरवर्षी गुरव समाजाच्या वतीने फलटण व खंडाळा तालुक्यामध्ये साजरा केला जातो सालाबादप्रमाणे यावर्षीचा संत काशिबा महाराज गुरव पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन मोर्वे तालुका खंडाळा येथील विजय गुरव यांच्या निवासस्थानी करण्यात आले आहे. फलटण व खंडाळा तालुक्याचे पुण्यतिथी सोहळा साजरा करण्याचे २५ वे वर्ष असल्याने हे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त फलटण व खंडाळा तालुका गुरव समाजाच्या वतीने मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील आणि फलटणचे नवनिर्वाचित आमदार सचिन पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे किकली तालुका वाई गावचे आदर्श सरपंच प्रसाद गुरव यांच्याबरोबरच गुरव समाजातील उच्चपदस्थ व्यक्ती यांनाही समाजभूषण म्हणून गौरविण्यात येणार आहे तरी या कार्यक्रमासाठी तालुक्यातील गुरव समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन खंडाळा व फलटण तालुका गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष सागर गुरव आणि राजेंद्र भांडवलकर यांनी केले आहे.

छत्रपतींच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या गडकोट किल्ल्यांवर कायम स्वरुपी भगवा झेंडा उभारावा : विकास गोसावी

कराड ■ कुलदिप मोहिते

भाजपा शहराध्यक्ष विकास गोसावी यांची निवेदनाद्वारे मागणी; भारतीय जनता पार्टी करणार पाठपुरावा



कराड साताराः महाराष्ट्रातील गडकोट किल्ले आणि ऐतिहासिक स्थळांवर कायम स्वरुपी भगवा झेंडा उभारावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी यांनी महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री नामदार श्री जयकुमारभाऊ गोरे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली

छत्रपती शिवाजी महाराजांनी भगवा झेंडा घेऊन स्वराज्य स्थापन केले आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी ते वाढवलं , आणि त्यानंतरच्या काळात मावळ्यांनी अटकेपार भगवा झेंडा फडकवला, असे असताना सुद्धा महाराष्ट्रातील किल्ल्यांवर आणि ऐतिहासिक स्थळांवर भगवा झेंडा दिसत नाही

काही दिवसांपूर्वी आलेल्या एका व्हिडिओमध्ये अत्यंत वाईट गोष्ट दिसत आहे महाराष्ट्र मध्येच असलेल्या जंजिरा किल्ल्यावर आणि परिसरात भगवा झेंडा नेण्यासाठी आणि फडकवण्यासाठी मनाई केली जात आहे, हे अत्यंत चुकीचे आहे

महाराष्ट्रातील एखाद्या किल्ल्यावर किंवा ऐतिहासिक स्थळावर भगवा झेंडा देऊ नये किंवा फडकवू नये यासाठी अटकाव केला जात असेल तर ही गोष्ट कधीही सहन केली जाणार नाही

महाराष्ट्र शासनाचा तर्फे महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांवर आणि ऐतिहासिक स्थळांवर सुद्धा कायमस्वरूपी भगवा झेंडा फडकवण्याची व्यवस्था करण्यात यावी आणि त्याची निगा राखण्यासाठी शासकीय यंत्रणा उभारावी, त्याचप्रमाणे प्रत्येक किल्ल्यांवर आणि ऐतिहासिक स्थळांवर , त्या किल्ल्याचे त्या स्थळाचे नाव लांबून दिसेल इतके मोठे उभारण्यात यावी अशी मागणी करण्यात आली , या निवेदनाची प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पाठवण्यात आली आहे

यावेळी भारतीय जनता पार्टी सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम, भाजपा सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी, जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, सातारा शहर सरचिटणीस प्रवीण शहाणे, विक्रांत भोसले, नितीन कदम, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विक्रम बोराटे आणि पदाधिकारी उपस्थित होते

शिक्रापूरच्या कर्तव्य फाउंडेशनचे वतीने अन्नदान; पाच हजार अनुयायांनी घेतला अन्नदानाचा लाभ

शिक्रापूर ■ प्रतिनिधी



शिक्रापूरः पेरणे ता. हवेली जि. पुणे येथील विजय स्तंभास मानवंदना देण्यास येणाऱ्या भीमा अनुयायांसाठी येथील कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने अन्नदान ,चहा, पाणी बॉटल, बिस्किट मोफत वाटप करण्यात आले. कर्तव्य फाउंडेशनचे वतीने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. वृक्षारोपण, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी, रक्तदान शिबिर, संविधान जनजागृती, आरोग्य शिबिरे , गरजू शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्कॉलरशिप विद्यार्थ्यांना लक्षवेधी प्रश्नसंच मोफत वाटप, परिसरातील विविध सामाजिक शैक्षणिक काम करणाऱ्या संस्था ट्रस्ट यांना भरीव मदत,अंध दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी नाट्य परिषदेस आर्थिक मदत, दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव रोपण कामी विशेष भरीव मदत, पंचक्रोशीतील पत्रकार बांधवांना विशेष सन्मान करत दीपावली फराळ वाटप, करडे येथील शिवचिदंबरम मंदिरातील हरिपाठ करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण उभा पोशाख वाटप , गणेश उत्सव गणेशोत्सव काळामध्ये किर्तन सेवेचे आयोजन, सांस्कृतिक मनोरंजनाचे विविध उपक्रम व कार्यक्रम, पंचक्रोशीतील विविध अनाथ आश्रमांना धान्य ,किराणा स्वरूपात मदत, संक्रांतीनिमित्त तिळगुळ वाटप इत्यादी भरीव उपक्रम व कार्यक्रम कर्तव्य फाउंडेशनचे वतीने पार पाडले जातात. विजय स्तंभाला मानवंदना देण्यात येणाऱ्या अनुयायांसाठी यावेळी फाउंडेशनच्या वतीने अंदाजे पाच हजार लोकांना अन्नदान चहा बिस्किटे पाणी बॉटल व्यवस्था करण्यात आली.

यावेळी शिक्रापूर नगरीचे आदर्श सरपंच रमेशरावजी गडदे, फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष मनीषाताई गडदे, सचिव संतोष काळे पाटील ,मार्गदर्शक अंकुशराव घारे, संचालक सदस्य राजाराम गायकवाड, मोहम्मदभाई तांबोळी, महेश शिर्के ,जितेंद्र काळोखे, सौ मेघा तांबे , सौ वैशाली गायकवाड,वंदना रामगुडे, संकेत गडदे,भरत खोले, हार्दिक गडदे, निलेश जगताप या सर्व सभासदांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी शिरूर तालुका आरपीआय अध्यक्ष नवनाथजी कांबळे यांनी कार्यक्रमास भेट देत उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी सत्यवान भुजबळ, भानुदास राऊत महिला व ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्रापूर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

हेडलाईन.रयत क्रांती शेतकरी संघटनेचे तहसीलदार यांना निवेदन; हत्या सारख्या गोष्टींचा निषेध

कराड ■ राहुल पवार



कराड येथील नायब तहसीलदार यांना निवेदन देताना शिवाजी पाटील विशाल पुस्तके कृष्णत क्षीरसागर अधिक पोळ.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महान महाराष्ट्रा हत्या घडत असल्याने हल्ले खोरांना न्याय पालेकेद्वारे फाशीची शिक्षा देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, कराड तालुका जिल्हा अध्यक्ष विशाल पुस्तके,पाटण तालुका अध्यक्ष कृष्णत क्षीरसागर,अधिक पोळ यांनी नायब तहसीलदार यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे संतोष देशमुख यांच्या हत्येचा रयत क्रांती शेतकरी संघटना निषेध करत आहे.अशा घटणा समाजात अस्वस्थता फसवणाऱ्या आहेत.त्या कोणत्याही परिस्थितीत सहन करता येणार नाहीत.राज्य सरकार आणि प्रशासनाला आमची मागणी आहे की हत्या सारख्या घटना घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलावीत अशा गंभिर गुण्यात सहभागी असलेल्या आरोपींना जलद गती न्याय पालेकेद्वारे फाशीची शिक्षा देण्यात यावी. रयत क्रांती शेतकरी संघटना राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे.

सातारा : पेठ किन्ही, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा येथील समीना नजिर मुलाणी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (श्झएण) परीक्षेत उल्लेखनीय

कोरेगाव ■ आज्जू मुल्ला



कोरेगाव : पेठ किन्ही, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा येथील समीना नजिर मुलाणी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (श्झएण) परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र कृषी प्रशासकीय सेवा गट बी सहाय्यक प्रशासकीय अधिकारी पदी राज्यात मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे.

'सातत्यपूर्ण प्रयत्न, योग्य मार्गदर्शन, आणि सकारात्मक दृष्टिकोन हा यशाचा मूलमंत्र आहे,' असे समीना यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की, 'प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी अविरत प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.'

समीना नजिर मुलाणी यांचे हे यश पेठ किन्हीसाठी अभिमानाचा क्षण ठरले आहे.

नवलाई देवी सामाजिक सेवा संस्था (रजि) सोनाट ,मुंबई यांच्या वतीने सन. २०२५ प्रथमच दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा संपन्न

सोनाट ■ प्रतिनिधी



सोनाटः .नवलाई देवी सामाजिक सेवा संस्था (रजि) सोनाट मुंबई यांच्या वतीने आयोजित राकेश कदम यांच्या संकल्पनेतून प्रथम दिनदर्शिका प्रकाशन सोहळा २०२५ मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्याला बाबूरावदादा संकपाळ (महाबळेश्वर तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), ह.भ.प. कोंडिराम महाराज शिंदे, अध्यक्ष १०५ गाव समाज (कुरोशी), सुभाषशेठ कदम उद्योजक, (तापोळा) गणेश उतेकर, महाबळेश्वर तालुका शिवसेना संघटक महादेव शिंदे सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस महाबळेश्वर, विशाल सकपाळ उपजिल्हाप्रमुख युवासेना सातारा, आनंद धनावडे चेअरमन शिवसागर बोट क्लब तापोळा. विठ्ठल धनावडे उद्योजक तापोळा. राम सकपाळ उपतालुकाप्रमुख महाबळेश्वर, रमेश कदम रामेघर, पांडूरंगबुवा जाधव, शंकर जाधव सौंदरी. दीपक शिंदे कुरोशी, रामचंद्र सावजी कदम सामजसेवक सोनाट. उपाध्यक्ष १०५ गाव समाज सुभाष शिंदे, सरपंच पांडुरंगदादा कदम मा. सरपंच/ उद्योजक सोनाट कोंडिबा कदम, कार्याध्यक्ष प्रकाश कदम, अध्यक्ष सुनिल कदम, उपाध्यक्ष विठ्ठल कदम, सचिव अशोक मारूती, कदम उपसचिव सुभाष कदम, खजिनदार शांताराम कदम उद्योजक सोनाट, नवलाई देवी सामाजिक सेवा संस्थेचे पदाधिकारी सदस्य ग्रामस्थ मंडळ सोनाट, महिला मंडळ सोनाट. आदी मान्यवर उपस्थित होते.

चिरनेर - मोठे भोम येथे जेनेरिक आधार जनरल स्टोर चे युवा उद्योजक अर्जुन देशपांडे यांच्या हस्ते उद्घाटन

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : ग्रामीण भागातील खेड्या पाड्यात गोर गरीब रुग्णांसाठी अल्पदरात औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी मोठे भोम गावातील कु.अक्षय नरेश पाटील व कु.साक्षी नरेश पाटील या तरुणाने जेनेरिक आधार चे संस्थापक अर्जुन देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली चिरनेर या ऐतिहासिक प्रसिद्ध गावा जवळील मोठे भोम येथील बस स्थानका जवळ जेनेरिक आधार च्या माध्यमातून एन एस फार्मसी आणि जनरल स्टोर या मेडिकलची उभारणी नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर केली.त्याचा शुभारंभ भारताचे युवा उद्योजक, जेनेरिक आधार चे संस्थापक अर्जुन देशपांडे यांच्या शुभहस्ते गुरुवारी (दि २) मोठ्या थाटामाटात करण्यात आला.

२०१९ साली जेनेरिक आधार या औषधाची देवाणघेवाण करणाऱ्या कंपनीची स्थापना करण्यात आली असून उरण परिसरातील ग्रामीण भागातील गोर गरीब रुग्णांसाठी अल्पदरात औषधे उपलब्ध व्हावी यासाठी मोठे भोम गावातील नरेश सावळाराम पाटील,निता नरेश पाटील याचे सुपुत्र कु.अक्षय नरेश पाटील व कु.साक्षी नरेश पाटील यांनी मोठे भोम गावातील बस स्थानका जवळील आई काँम्प्लेक्स येथे जेनेरिक आधार च्या माध्यमातून एन एम फार्मसी आणि जनरल स्टोर या मेडिकलची उभारणी केली.या ठिकाणांहून विविध दुर्धर आजारावरील जेनेरिक औषधे अत्यंत अल्पदरात उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातील युवा तरुण साक्षी व अक्षय या बहिण भावाने गोर गरीबांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तत्पर राहावे असा विश्वास जेनेरिक आधार चे संस्थापक अर्जुन देशपांडे यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ प्रकाश मेहता,सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, आधार चे रितेश सावळे, काँग्रेस पक्षाचे तालुका तथा तिरंगा पतपेढीचे उपाध्यक्ष घनश्याम पाटील, माजी सरपंच अविनाश म्हात्रे, अरुण ठाकूर, विकास भोईर , अर्जुन मोकल,शिवधन पतपेढी चेअरमन गणेश म्हात्रे, नाथा नारंगी कर,पंकज ठाकूर, माजी सरपंच श्रीधर पाटील, पोलीस पाटील श्याम पाटील, विकास पाटील, पोलीस पाटील उलवे जनार्दन पाटील, उद्योजक एन डी भोईर, ग्रामपंचायत सदस्या भारती मनोहर पाटील, प्रभाकर पाटील,एच एन गावंड, सतीश पाटील, धर्मेंद्र म्हात्रे, महेंद्र ठाकूर सह इतर मान्यवर उपस्थित होते.त्यांचे स्वागत कु अक्षय कु साक्षी नरेश पाटील यांनी केले.कमी पैशात दर्जेदार औषधे गोळ्या उपलब्ध होणार असल्याने जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

४५ वर्षांपूर्वीची मैत्री व साठवणीतल्या आठवणींना उजाळा

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : परभणीतील हॉटेल क्षकिसानञरसवंतीगृह म्हणजेच आमचा एका काळातील मैत्री ग्रुपचा आड्डा.

हे हॉटेल पोहे व दही मटकी साठी फारच प्रसिद्ध आहे. केवळ प्रसिद्धच नाही तर ते सुप्रसिद्ध असेच म्हणावे लागेल. १९८० च्या दशकातील ह्या हॉटेल सोबत अशोक सोनी, सुरेश सोनी, नारायण जाधव, विजयराव गव्हाणे, ब.ल. तामसकर, अविनाश मुळावेकर असा बराच मोठा मित्र-परिवार अगदी ह्या प्रतिष्ठानच्या स्थापनेपासूनच जोडला गेला आहे.

त्याकाळात टिव्ही, मोबाईल नसल्याने येथे दररोज संध्याकाळी सर्व मित्र, राजकारणी, पत्रकार, वकील, व्यापारी यांची मी मैफील जमायची. विविध राजकीय व सामाजिक विषयांवर होणाऱ्या संवादातून विचारांची आगळीक व आदान-प्रदान व्हायची.

आज पेडा हनुमान मंदिरात बऱ्याच दिवसानंतर सुदामराव कदम दाजी यांची अचानक भेट झाली. सुदामरावांच्या सोबत एक भावनिक नातं निर्माण झालेलं असल्यामुळे त्यांनी आग्रहपूर्वक माझा हात धरून हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी म्हणून घेऊन गेले होते. तेथील प्रसिद्ध मटकी व आद्रकची चहाचा आस्वाद घेताना ओघा-ओघानेच साठवणीतल्या जुन्या आठवणीत बरेच रमलो. साधारण एक तास कसा गेला हेच मुळी दोघांपैकी कोणालाही कळलच नाही.

जीवनात असे मित्र भेटणे दूरापास्तच झाले आहे. ते ही चिरकाल मैत्रीपूर्ण संबंध ठेवणारे असे लोक दुर्मिळ होत चालले आहेत.

किसान रसवंतीगृह व हॉटेल ला जवळपास पंचेचाळीस वर्षे पूर्ण होत आले आहेत. आज मितीला त्यांच्या पुढील पिढीतील तरूणाई कारभाराची सर्व जबाबदारी सांभाळत आहेत. तर, सुदामराव मात्र फक्त आणि फक्त आजही त्याच उमेदीने प्रतिदिन किमान दोन तास तरी निश्चितपणे वेळ देतात. वैशिष्ट्य म्हणजे, ह्या यंत्रातूनच बर्फविरहित थंड रस मिळय असतो. ज्यामुळे साठवणीतल्या त्या जुन्या आठवणी बरोबरच मैत्रीलाही उजाळा मिळला जाऊन आमच्या थकलेल्या त्या मैत्रीला ऊसाच्या त्या गार गार थंड रसामुळे गारव्यातही पुन्हा ताजे तजेल बनण्याची उर्जा मिळाली, हे विशेषत्वाने म्हणावे लागेल.

महात्मा गांधी यांच्या कर्मभूमित सेवा दिल्याचा आनंद -राहुल कर्डिले

प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्यासहकार्याने विकासाला गती; स्वागत व सत्कार समारंभ कार्यक्रम

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : जिल्ह्यात गेल्या दोन अडीच वर्षात शासनाच्या विविध योजना, धोरणात्मक निर्णय, शासकीय व अशासकीय कार्यक्रम, लोकसभा व विधानसभा निवडणूक चांगल्या पध्दतीने पूर्ण करण्यास सर्व यंत्रणांनी महत्वाची भुमिका बजावून समन्वयाने कामे केल्याने जिल्ह्यात उत्तम प्रशासन ठेवण्यास मदत मिळाली. यामुळेच राष्टापिता महात्मा गांधी यांच्या कर्मभूमीत काम करण्याचा अधिक आनंद आहे, असे मनोगत तत्कालीन जिल्हाधिकारी व सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डिले यांनी स्वागत व सत्कार समारंभ प्रसंगी सत्काराला उत्तर देतांना व्यक्त केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात महसूल प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी वान्मथी सी यांचे स्वागत व तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निरोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वान्मथी सी. होत्या. उपवनसरंक्षक हरविंद सिंग, परिविक्षाधिन जिल्हाधिकारी रवैय्या डोंगरे, परिविक्षाधिन पोलीस अधीक्षक राहुल चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, निवासी उपजिल्हाधिकारी शिवराज पडोळे, उपजिल्हाधिकारी प्रियंका पवार आदी उपस्थित होते.

भारतीय प्रशासन सेवेत रुजु झाल्यापासुन गेल्या नऊ वर्षातील कार्यकाळात विविध जिल्ह्यात केलेल्या कामकाजात वर्धा जिल्ह्यातील नागरिकांचे, अधिकारी व कर्मचा-याचे चांगले सहकार्य मिळाल्यामुळे चांगली कामे करण्याची संधी मिळाली हे कायमस्वरुपी स्मरणात राहील. त्यामुळे जिल्ह्यातील कृषि क्षेत्रातील स्ट्रॉबेरी क्षेत्र, रेशिम क्षेत्र वाढविण्यास मदत मिळाली असून त्याचबरोबर वनराई बंधारे, धामनदी स्वच्छता उपक्रम यशस्वी करण्यास मदत मिळाली असल्याचे राहुल कर्डिले म्हणाले. विदर्भात पुन्हा काम करण्याची संधी मिळाल्यास नक्कीच परत येईल असेही ते म्हणाले.

जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ता सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून अपघात स्थळाची निवड करुन रस्ता सुरक्षा बाबत कार्यवाही करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी झाले असल्याचे यावेळी त्यांनी आर्वजून सांगितले.

जिल्ह्यात चांगले व यशस्वी उपक्रम राबविणारे जिल्हाधिकारी म्हणुन राज्यात राहुल कर्डिले यांची ओळख आहे. लोकांसोबत लोकांमध्ये जाऊन प्रशासकीय अधिका-यांसोबत कोणत्याही प्रकारची कटूता न निर्माण होऊ देता कामे करण्याची त्यांची शैली वाखान्याजोगी आहे. प्रशासनातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी येणा-या प्रत्येक नागरिकांना सौजन्याची वागणूक देऊन वेळेत कामे पूर्ण करावी. शासकीय कामांमध्ये कुठल्याची प्रकारची कुचराही खपवून घेतली जाणार नाही, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी म्हणाल्या.

सामान्य माणसासोबत राहून काम करण्याची भावना असलेले राहूल कर्डिले यांनी सामान्य माणसाला सेवा देणे हे ध्येय ठेवून सेवादूत प्रकल्प यशस्वी राबविला तसेच ई-सेवा ऑफीस प्रकल्प जिल्हास्तरावरुन गावपातळीवर सुरु करण्यात आला असल्याचे नरेंद्र फुलझेले म्हणाले.

यावेळी हरविंद सिंग, राहुल चव्हाण, रवैय्या डोंगरे, सुरज गोहाड, शिवराज पडोळे यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विविध विभागाच्यावतीने राहुल कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन नायब तहसीलदार अतुल रासपायले यांनी केले. कार्यक्रमाला सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

हिंदी विश्वविद्यालयाने राबविली श्रमदान मोहीम



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात शुक्रवार, ०३ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्वविद्यालयाचे मुख्य प्रवेश द्वार व बँक परिसरामध्ये श्रमदान करून परीसर स्वच्छ करण्यात आला. याप्रसंगी विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रो. आनन्द पाटील, परिसर विकास विभागाचे प्रभारी डॉ. एम.एम. मंगोडी, राष्ट्रीय सेवा योजनेचे संयोजक असोशिएट प्रोफेसर डॉ. बालाजी चिरडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. विधु खरे दास, डॉ. शिव सिंह बघेल, डॉ. प्रमोद जोशी, जनसंपर्क अधिकारी बी.एस. मिरगे, सचिन सोनी, डी. गोपाल, कमल शर्मा, मोनिका, निलिमा कांबळे यांच्या सह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अभिषेक कुमार, गुड्डू कुमार, पुनमचन्द, महेन्द्र, अनिल, देवेन्द्रपाल सिंह, सदिक, ऋषि कुमार, विशाल कुमार, रोहित सीद, प्रियांशु कुमार, श्रीयांसी सतरूपा, साहिल, संजय कुमार, किशोर कुमार मेघवाल, विश्वास सिंह, पुरूषोत्तम कुमार सिंह, हर्ष गुप्ता, खुशाल सिंह, युगांक, सुजीत सिंह, मृत्युंजय राय, मधु, धनंजय उपस्थित होते.

तायवाडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयु तायवाडे या महाराष्ट्र शासनाच्या 'आधूनिक सावित्री' पुरस्काराने सन्मानित

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी :महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने करिअर कट्टा अंतर्गत नागपूर विभागाच्या प्राचार्य प्रवर्तक तायवाडे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयु तायवाडे यांना 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत दिनांक ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'आधुनिक सावित्री' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजाला दिशा देऊन स्त्री शिक्षण व महिला सबलीकरणाचा दीपस्तंभ आपल्यासमोर उभा केलेला आहे. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा आजच्या युगात अविरतपणे चालवून आधुनिक काळातील बदलत्या शैक्षणिक, सामाजिक, उद्योजकीय आणि सांस्कृतिक प्रवाहाला अनुसरून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काळानुरूप झालेल्या बदलांचा स्वीकार करून डॉ.शरयु तायवाडे यांनी या क्षेत्रामध्ये अत्यंत चांगले योगदान दिले आहे. म्हणून करिअर कट्ट्याच्या वतीने 'आधुनिक सावित्री २०२५' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.हा पुरस्कार मिळाल्यामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकगण व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्राचार्य डॉ.शरयु तायवाडे यांचे अभिनंदन केले.महाविद्यालयातील करियर कट्टा समन्वयक व इंग्रजी विभागप्रमुख डॉ.वर्षा वैद्य व आय.क्यू ए.सी समन्वयक डॉ.गिरीष काटकर आणि समाजशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. प्रगती सुभाष यानी डॉ.शरयु तायवाडे यांचे पुष्पगूच्छदेवून सत्कार केले.हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता आप्पासाहेब पवार सभागृह, बारामती या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

एकल महिला संघटनेच्या वतीने आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी



तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती एकल महिला संघटनेच्या वतीने उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी एकल महिला संघटनेच्या धडाडीच्या कार्यकर्त्या तथा समाजसेविका रुक्मिणी नागापुरे यांच्या कल्पकतेतून आद्य शिक्षिका थोरमाता सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध विधायक उपक्रम घेऊन साजरी केली जाते. संघटनेतील अनेक महिलांनी प्रथम शिक्षिका तथा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या एकूणच जीवन कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे करून त्यांच्याबद्दल कर्तज्ञता व्यक्त केली. यावेळी संघटनेच्या तालुकाध्यक्ष शिल्पा पंडित, मंजुषा वारे, ज्योती निर्मळ, रश्मी पाटील, आयोध्या जगताप, सुषमा घाडगे, संजीवनी पखाले आदी महिला भगिनी उपस्थित होत्या.

लोकमान्य विद्यालय,आष्टी येथे सावित्री बाई फुले जयंती संपन्न

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद):आज दिनांक ३ जानेवारी २०२५ रोज शुक्रवार ला लोकमान्य विद्यालय,आष्टी येथे सावित्री बाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.हा कार्यक्रम दुपारी ३.३० वाजता घेण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक माननिय श्री.दाभाडे सर यांच्या हस्ते भारत माता व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.त्यानंतर इतर शिक्षकांनी सुद्धा भारत माता व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यानंतर आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या सो.गजाम मॅडम यांनी सावित्री बाई फुले विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात कु.अपुर्वा भारसाकडे (५ अ),कु.कामाक्षी चव्हाण (५क),कु.ईश्वरी राणे(६क),कु.आरती जाधव (६ब),कु.वेदिका अग्रवाल(७अ) यांनी सावित्रीबाई फुले विषयी आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर कु.आनंदी गायकवाड(८अ)हिने सावित्रीबाई फुले यांची वेशभुषा सादर करून एकपात्री नाटक सादर केले.त्यानंतर ६ क विद्यार्थिनी कु.पुर्वा उमेकर ,कु.गुंजन काकपुरे यांनी सावित्री बाई फुले विषयी गीत सादर केले.या कार्यक्रमाचे संचलन कु.तेजस्वीनी कठाणे(९ब), प्रास्तविक कु.नियती माहुरे(७अ) तर आभार प्रदर्शन कु.साची निंभोरकर (७क) हिने केले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्री दाभाडे सर, ज्येष्ठ शिक्षिका जांभुळकर मॅडम प्रमुख वक्त्या सो.गजाम मॅडम तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

संस्कारक्षम पिढी घडविण्याकरिता स्त्रियांनी सावित्रीबाई फुले यांचा वसा घेण्याची गरज : प्राचार्या लता वाघ

सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोखारा तसेच सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुलेंची १९२ वी जयंती बालिका दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका प्राचार्य लता वाघ, रामकृष्ण वाघ आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना काहाळे, मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक सायली पिदळी लाखे, बी. सी .ए विभाग प्रमुख प्रा.किरण पांडे, उपमुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जांभुळकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलित करण्यात आले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना संस्थेच्या संचालिका प्राचार्या लता वाघ यांनी विद्यार्थिनी आजच्या काळात सावित्रीचा वसा घ्यावा परंतु आधुनिकतेच्या नावावर स्त्री मर्यादा देखील सांभाळावी त्याचबरोबर समानतेचा हक्क बजावत असताना त्याच्या सीमांचे उल्लंघन होणार नाही याची सुद्धा प्रत्येक स्त्रीने काळजी घेतल्यास आपण एक सुदृढ भारत तयार करू शकतो असे सांगितले. प्रत्येक स्त्रीने शिक्षिकेच्या भूमिकेतून संस्कारमय होऊन येणाऱ्या पिढीलाही देखील संस्कारमय करावे अशी इच्छा व्यक्त केली. त्याचबरोबर विद्यार्थिनी मध्ये बीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सोनम वर्षकर व अकरावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी अश्विनी गेडाम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सायली पिदळी लाखे सूत्रसंचालन प्रा शुभांगी वाघ आभार प्रदर्शन प्रा. सुषमा वडस्कर यांनी केले कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

तायवाडे महाविद्यालयात 'सामुहिक वाचन' कार्यक्रमाचे आयोजन

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : वाचन हे जीवनात अत्यंत महत्वाचे आहे. वाचन ही एक सतत अमलात आनावी अशी सवय आहे. या वाचनामुळे व्यक्तिमचा विकास होतो. बुध्दिला चालना मिळते. मानसीक शांती लाभते. म्हणुनच पुस्तक आणि वाचन हे चांगले मित्र असुन यांच्याशी मैत्री करावे. असे उदबोधन कार्यकमाचे प्रमुख वक्ता प्रा. कोमल ठाकरे यानी केले. तायवाडे महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या अंर्तगत दि. २ जानेवारी २०२५ रोजी 'सामुहिक वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे. त्या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. वर्षा वैदय यांनी आपल्या अध्यक्षीय भाषनात त्यांनी उपस्थितांना वाचना कडे प्रेरित होण्यास सांगितले.

या प्रसंगी सभागृहात उपस्थित विद्यार्थीवर्गाने सामुहिक वाचन आनंदाने केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. वकिल शेख, तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र वाटाणे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन पोलेनवार डॉ. रामटेके, डॉ. सुनील घुगल व डॉ.विष्णु चव्हाण आदी प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे ग्रंथपाल मंजुषा मामीलवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला मोठया संख्येत विद्यार्थी वर्गाने सहभाग नोंदविला.

ग्रंथ प्रदर्शनीतून वाचन संस्कृतीची वृध्दीगत ठेवण्यास मदत होईल :अनिरुध्द राजुरवार

ग्रंथ प्रर्शनाचे उद्घाटन संपन्न; वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : आजच्या डिजीटल युगात वाचन संस्कृती लोप पावली जात असून या ग्रंथ प्रर्दशनीतून तरुण पिंढीमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन वाचन संकृती वृध्दींगत ठेवण्यास मदत होईल, असे मनोगत जिल्हा नियोगजन अधिकारी अनिरुध्द राजुरवार यांनी आज ग्रंथ प्रर्दशनीच्या उद्घाटन प्रसंगी केले.

जिल्हा शासकीय ग्रंथालयाच्यावतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत शासकीय जिल्हा ग्रंथालय येथे ग्रंथप्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती या प्रदर्शनीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने, सुधीर प्रकाशनचे संचालक सुधीर गवळी आदी उपस्थित होते.

ग्रंथ हे आपल्या पुरातन संस्कृतीचा अमुल्य ठेवा असून ग्रथांचे वाचन केल्याने कायम स्वरुपी स्मरणात राहून चांगल्या विचाराची आदान प्रदान करण्यास मदत होते. ग्रंथ वाचनांनी ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असून वाचन चळवळ बळकट करण्यासाठी युवकांनी जास्तीत जास्त वाचन करावे असे आवाहन अनिरुध्द राजुरवार यांनी पुढे बोलतांना केले.

सोशल मिडियाच्या युगात वाचनाला महत्व देणारी पिढी निर्माण होणे गरजेचे असून यासाठी शासनाचा वाचन संकल्प उपक्रम महाराष्टभर राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या निमित्ताने जिल्हा ग्रंथालयात आयोजित पुस्तक प्रदर्शनीत विविध ग्रंथ ठेवण्यात आले आहे. वाचकांनी या ग्रंथाचे केवळ अवलोकन न करता वाचन करावे असे आवाहन रवी गिते यांनी केले. अभ्यासाव्यतीरिक्त इतर वाचनांनी ज्ञानात भर पडत असून लेखकांच्या अनुभवनां तसेच लेखकांना समजून घेण्याची संधी प्राप्त होते. मराठीत उत्तम दर्जाचे साहित्य असून या साहित्याचा आपली ज्ञान कक्षा समृध्द करण्यासाठी नियमित वाचन करावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी लावण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनीला मान्यवरांनी भेट देऊन ग्रथांचे अवलोकन केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

गायत्री महायज्ञाची सुरुवात भव्य कलश यात्रेने



कोराडी ■ दिलीप येवले

कोराडी :माँ गायत्री पीठ शांतीकुंज हरिद्वार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उत्तर नागपूर विभाग आर्यनगर शाखेतफै २४ कुंडीय गायत्री महायज्ञाचा शुभारंभ २ जानेवारी रोजी आर्य नगर कोराडी रोड येथे संपन्न झाला. हा महायज्ञ ५ जानेवारीपर्यंत चालणार आहे. या पवित्र उत्सवाचे उद्घाटन भव्य कलश यात्रेने करण्यात आले. शेकडो कलशधारी भगिनी, गरुडदेवाची पालखी, विविध तबकड्या.प्रमुख आकर्षण होते.

महायज्ञासाठी हरिद्वारहून खास आलेले संत उपस्थित होते. यावेळी निमंत्रित विशेष अतिथी मिलिंद, माजी आमदार व नगर सेवक चौधरी यांचा आयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

ध्यानधारणा, प्राणायाम, प्रज्ञा पुराण कथन, विविध विधी, विराट दीप महायज्ञ, युग साहित्य ग्रंथ प्रदर्शन, आरोग्य शिबिर आदी प्रमुख आकर्षणे असणार आहेत. सर्व समर्पित नागरिकांनी या शुभ संधीचा लाभ घ्यावा. कार्यक्रमात गायत्री परिवार आर्यनगर शाखेचे सर्व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

ते यशस्वी करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.

विद्यार्थ्यांनी साकारली सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा; महिला मुक्ती दिनानिमित्त महिला पालक वर्गा करिता क्रीडा स्पर्धेचे आयोजन



सेलू ■ प्रशांत झाडे

सेलू :स्थानिक श्री संत केजाजी कॉन्व्हेन्ट घोराड येथे क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे संस्था संचालक तथा मुख्याध्यापक प्रशांत झाडे यांनी सर्वप्रथम सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करीत विद्यार्थांना सावित्री बाई फुले यांनी केलेल्या कार्याविषयी माहिती दिली. शाळेतील नर्सरी, केजी वन, केजी टू च्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा परिधान केली होती. केजी टू च्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी दोन शब्दात आपले मनोगत बोलून दाखवले. महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधत शाळेत महिला पालक वर्गा करिता शाळेत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर क्रीडा स्पर्धेचे मोठ्या प्रमाणात महिला पालक वर्गानी सहभाग नोंदविला होता, महिला पालक वर्गाचा उत्साह बघता जणू त्यांनी महिला मुक्ती दिन मोठ्या हिरीरीने साजरा केला असे चित्र होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करिता शाळेच्या शिक्षिका सुवर्णा पिसे, स्वाती फड्डिंग , प्रिया शिंदे, आरती भुरे यांनी परिश्रम घेतले.

आईंच्या स्मृती जागविण्यासाठी रक्षा विसर्जनातून पर्यावरण जागृती : चाटगावच्या देशमाने बंधूंचा आदर्श पायंडा : सुधारणावादी कृतीचे जिल्हाभरातून स्वागत

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : जेष्ठ पत्रकार बाबा देशमाने आणि सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ देशमाने यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले. पारंपरिक परंपरेला फाटा देत आपल्या आईंच्या स्मृती कायम स्मरणात राहण्यासाठी शेतातच रक्षा विसर्जन करून त्यावर वृक्षारोपण केले. दरम्यान, देशमाने बंधूंच्या या सुधारणावादी निर्णयाचे जिल्हाभरातून स्वागत होत आहे.

मौजे चाटगाव (ता. किल्लेधारूर, जि. बीड) येथील रहिवाशी जेष्ठ पत्रकार बाबा देशमाने आणि सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ देशमाने यांच्या मातोश्री दिवंगत लक्ष्मीबाई श्रीहरी देशमाने यांचे रविवार, २९ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता बीड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर चाटगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. देशमाने परिवाराने पारंपरिक पद्धतीला फाटा देत दिवंगत लक्ष्मीबाई देशमाने यांच्या अस्थी, रक्षा विसर्जन शेतातच करून त्यावर वृक्षारोपण केले आहे. हा आदर्श निर्णय घेण्यासाठी परिवारातील श्रीहरी देशमाने, सखाराम देशमाने, मंगल देशमाने, छाया देशमाने, शिल्पा देशमाने, सचिन देशमाने, सूरज देशमाने यांनी पुढाकार घेतला. देशमाने परिवाराने घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मान्यवरांकडून आदर्श निर्णयाचे स्वागत

देशमाने परिवाराने पारंपरिक पद्धतीला फाटा देत दिवंगत लक्ष्मीबाई देशमाने यांच्या अस्थी, रक्षा विसर्जन शेतातच करून त्यावर वृक्षारोपण केले आहे. हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश असून हा आदर्श इतरांनी घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी कॉ. नामदेवराव चव्हाण यांनी व्यक्त केले. मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, प्रा. सुशिलाताई मोराळे, कॉग्रेस नेते दादासाहेब मुंडे, दत्ता कांबळे, पुण्यातील युवा उद्योजक गोविंद केकान, जेष्ठ पत्रकार तुकाराम येवले, बंडू खांडेकर, संतोष स्वामी, सरपंच महादेव केकान, माजी सरपंच बालासाहेब केकान, पोलिस पाटील विठ्ठल केकान, सामाजिक कार्यकर्ते संपत वावळकर, सखाराम वावळकर, विकी गवळी, राम बीडकर, राहुल खुणे, निवृत्ती प्रधान, वाल्मिक वावळकर आदी मान्यवरांनी देशमाने परिवाराच्या सुधारणावादी निर्णयाचे स्वागत केले आहे.

वाढते प्रदूषण रोखण्याची गांभीर्याने विचार करण्याची गरजः बाबा देशमाने

नदी, ओढे अंत्यविधीनंतर टाकलेल्या अस्थी, रक्षा विसर्जनामुळे प्रदूषित होत आहेत. परिणामी त्यावर अवलंबून असलेल्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. शासन या बाबतीत व्यापक स्वरूपात जनजागृती करत आहे. असे असले तरी हे प्रयत्न तोडके पडत आहेत, या सर्व परिस्थितीचा विचार करून आणि आईंच्या स्मृती कायम स्मरणात ठेवण्यासाठी शेतातच रक्षा विसर्जन करून त्यावर वृक्षारोपण केले, पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे, अशी प्रतिक्रिया दिवंगत लक्ष्मीबाई यांचे जेष्ठ पुत्र बाबा देशमाने यांनी दिली.

भारतीय बौद्ध महासभा केजच्यावतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



केज ■ तात्या गवळी

केजः भारतीय बौद्ध महासभा केज च्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते लिंबराज बापु गायकवाड बालासाहेब जोगदंड,बापूसाहेब गायकवाड,सोनू गायकवाड, बळीराम सोनवणे, रंजीत घाडगे,आश्रुबा खरात यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.

यावेळी बोलताना मान्यवर म्हणाले की, भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले यांची ओळख त्यांनी त्याकाळी असंख्य अडचणींना तोंड देत शिक्षणासारखे पवित्र कार्य केल्यामुळे निर्माण झाली.

पुढे चालून भारत सरकारने त्यांच्या नावाने टपाल तिकीट काढून तसेच विद्यापीठाला त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा पाया निर्माण केला आहे आता फक्त आपल्याला त्यांच्या विचारावर चालून देश शिक्षणाच्या बाबतीत आणखीन मजबूत करावयाचा असून समाजातील प्रत्येक स्त्री ने केजी टू पीजी शिक्षण घेतल्याशिवाय आणि प्रगल्भ झाल्याशिवाय स्थिर बसू नये असे आव्हान मान्यवरांनी यावेळी कार्यक्रमा दरम्यान केले.

कार्यक्रमाला असंख्य बंधू बांधवांची भगिनींची उपस्थिती होती.

राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत सावित्रीबाई फूले जयंती उत्साहात साजरी

केज ■ तात्या गवळी



केजः स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.यांची तर प्रमुख उपस्थिती म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्हि.बी.तसेच श्रीमती ध्वजा गायकवाड व श्रीमती अनिता जाधव यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.यांनी प्रतिमापुजन केले.ज्या माऊलीमुळे लेकींना शिक्षणाची दारे खुली झाली त्या सावित्रीबाई फूले यांना शाळेतील सर्वांनी कृतज्ञतापुर्वक अभिवादन केले.नंतर साने गुरुजी यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आयोजित साने गुरुजी प्रश्न मंजुषा मध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमा निमित्त आयोजित भाषणांमध्ये शाळेतील छोट्या 'सावित्री'म्हणजेच विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला व आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांच्या जीवनातील प्रसंग सांगुन त्यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला,प्रतिकुल परिस्थिती मध्ये समाजाला सकारात्मक दिशेने नेण्यासाठी सावित्रीबाई यांचे योगदान त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषण करताना श्रीमती चाटे म्हणाल्या सावित्रीबाई केवळ महिलांना शिक्षण देऊन थांबल्या नाहीत.त्यांना सक्षम,धाडसी करण?यासाठी विविध रूढी परंपरांचा नायनाट करण?याचे कामही त?यांनी केले.सावित्रीबाईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अभ्यासात प्रगती करत राहा असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.क्षीरसागर आर.एस.यांनी तर आभार श्री.देशमुख ए.डी.यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.डिरंगे जी.बी.व मस्के जे.आर.यांनी मोलाचे सहकार्य केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या नावांचा उल्लेख करुन जातीय तेड निर्माण करु पहाणाऱ्या ज्ञानेश्वर इंगळे वर गुन्हा दाखल करा-केज तालुका भाजपा



केज ■ तात्या गवळी

केजःकेज तालुक्यातील कळंबआंबा येथील रहिवासी ज्ञानेश्वर इंगळे यांनी दिनांक २ जानेवारी२०२५ रोजी आपहरण झाल्याचे कुंभाड रचुन महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या विषयी टक्केवारी देऊन काम आणायची आहेत ,आसा सोशल मीडिया वर व्हिडिओ तयार करून पाठविलेला आहे, जातीय तेड निर्माण होईल असे वक्तव्य करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करावी असे निवेदन केज तालुका भाजपा च्या वतीने केज तहसीलदार यांना दिले आसुन या निवेदनावर ५० भाजपा कार्यकर्त्यांनी सह्या केल्या आहेत.

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांना तात्काळ अटक करण्यात यावे-ग्रामस्थांची मागणी

केज ■ तात्या गवळी



केजः राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांना तात्काळ अटक करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सातेफळ येथे दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी रात्री १०-३० वाजण्याच्या सुमारास दीपक प्रल्हाद घाडगे, नितीन बाबुराव जगताप रा. सातेफळ यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा चौक येथील राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पोस्टर जाणीवपूर्वक फाडून विटंबना केलेली आहे.सदर प्रकरामुळे समाजाच्या भावना दुखवण्याचे काम केले आहे.

दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी सर्व गावकऱ्यांनी युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केलेली आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल होऊन देखील आरोपींना अद्यापही अटक केलेली नाही. वरील दोन्हीही आरोपींना तात्काळ अटक करून सर्व ग्रामस्थांना न्याय देण्यात यावा असे या लेखी निवेदनात म्हटले आहे. जर आरोपींना तात्काळ अटक न केल्यास सर्व गावकऱ्यांच्या वतीने दिनांक ६ जानेवारी रोजी मांगवडगाव फाटा येथे सकाळी ठीक१०-०० वाजता रस्ता रोको आंदोलन करणार आहोत असा प्रशासनाला लेखी निवेदनाच्या माध्यमातून इशारा देण्यात आला आहे.

या लेकिन निवेदनावर गणेश भांगे,केशव भांगे,रविराज भांगे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ॲड. विवेक वैद्य यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

केज ■ तात्या गवळी



केजः ॲड. तथा सामाजिक कार्यकर्ते विवेक वैद्य यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते तथा ?ड. वैभव वैद्य यांच्या वाढदिवसानिमित्त दैनापुर ता. परळी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, प्रमुख पाहुणे म्हणून भीमशक्ती संघटनेचे प्रसिद्धीप्रमुख सुनील धीमधीमे, भीमशक्ती संघटनेचे कार्यकर्ते बाळू आडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून ?ड. विवेक वैद्य यांनी अनावश्यक खर्चाला फाटा देत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून सामाजिक उपक्रम घेऊन अत्यंत साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी चंद्रकांत खरात सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व समजून सांगितले त्याचबरोबर बौद्धिक व कौशल्य या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी ?ड. विवेक वैद्य, शाळेचे मुख्याध्यापक गाडेकर सर, कांदे सर, मुंडे सर, गोरे सर, धाकपाडे सर, आघाव सर, श्रीमती झेंडे मॅडम, श्रीमती राठोड मॅडम यांच्यासह गावातील नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

मौलाना आझाद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक खतीब अमजदोदिन मुम्ताजोदिन यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

५ जानेवरी रोजी बीड येथे पुरस्कार होणार प्रदान

केज ■ तात्या गवळी



केजःकेजचे भुमिपुत्र मौलाना आझाद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अमजदोदिन मुमताजोदिन खतीब यांनी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. ५ जानेवरी रोजी बीड येथील डॉ. बाबासाहेब अंबेडकर भवन येथे पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

अमजदोदिन मुम्ताजोदिन खतीब यांना बीड येथील सा.द. स्कुल एक्सप्रेस यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे. मुख्याध्यापक खतीब अमजदोदिन मुम्ताजोदिन यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर होताच मौलाना आझाद शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी आणि त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव करण्यात येत आहे.

डॉ.हनुमंत सौदागर मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



केज ■ तात्या गवळी

केजः तालुक्यातील आनंदगाव येथील भूमिपुत्र डॉ.हनुमंत सौदागर यांना मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने तुळजापूर येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

महाविद्यालयत्तर उपक्रम पर्यावरण संवर्धन, जल साक्षरता, स्वच्छता अभियान, उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षण कृतिशील उपक्रम अशा विविध कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कार वितरण सोहळ्यास जि.प.धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गायकवाड,इतिहास अभ्यासक डॉ.श्रीमंत कोकाटे,

तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते,संयोजन समितीचे राजकुमार धुरगुडे,महेंद्र धुरगुडे, आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वातंत्र्य सेनानी भानुदासराव धूरगुडे यांच्या जयंतीनिमित्त मराठवाडा समन्वय समिती पुणे यांच्या वतीने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा हा प्रतिष्ठेचा मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार तुळजापूर येथे देऊन गौरविण्यात आले.

हारुणभाई इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामी समर्थ वृद्ध आश्रम येथे ब्लॅकेटचे वाटप

अनावश्यक खर्चाला फाटा देत साध्या पद्धतीने इनामदार यांचा वाढदिवस साजरा

केज ■ तात्या गवळी



केजःजनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त केज येथील स्वामी समर्थ वृद्ध आश्रम येथे ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले.अनावश्यक खर्चाला फाटा देत साध्या पद्धतीने हारुणभाई इनामदार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांचा वाढदिवस हा १ जानेवारी रोजी असतो प्रत्येक वर्षी नगरसेवक व कार्यकर्ते शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करत असतात. इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे कार्यकर्ते व मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात खर्च करत असतात.

परंतु यावर्षी केज तालुक्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच स्व. संतोष अण्णा देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे.

सदर प्रकरणामुळे केज तालुक्यासह बीड जिल्हा दुःखामध्ये आहे अशा दुःखद वातावरणामध्ये वाढदिवस साजरा करणार योग्य नाही असा संकल्प इनामदार व त्यांच्या जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख मार्गदर्शक यांनी केला व गेल्या एका आठवड्यात पूर्वी शहरांमध्ये जनविकास परिवर्तन आघाडीची बैठक घेऊन यावर्षी इनामदार यांचा वाढदिवस साजरा न करता वाढदिवस साजरा करण्याकरता अनावश्यक होणारा खर्च टाळून देशमुख कुटुंबीयांना १ लाख १ हजार रुपयाची मदत देण्याचे सदर बैठकीमध्ये ठरवण्यात आले. इनामदार यांनी त्यांचे नगरसेवक व कार्यकर्ते आणि मित्र परिवाराला आवाहन करून सांगितले की, हार,फुल,शाल, पुष्पगुच्छ व बॅनर यासारख्या बाबीवर अनावश्यक होणारा खर्च टाळून आपण सर्वजण मिळून स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या कुटुंबियांना मदत करू असे त्यांनी आवाहन केले होते.

यावर्षी त्यांचे नगरसेवक व कार्यकर्त्यांनी आणि मित्र परिवारांनी अत्यंत साध्या पणाने हारुणभाई इनामदार यांचा वाढदिवस साजरा केला.

इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त केज येथील स्वामी समर्थ वृद्ध आश्रमातील वृद्धांना ब्लॅकेट चे वाटप करण्यात आले. स्वामी समर्थ वृद्ध आश्रमातील आजी-आजोबा सोबत जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी चर्चा करून आजी-आजोबांचे प्रश्न जाणून घेतले. यावेळी त्यांनी आजी-आजोबांना आम्ही तुमच्या पाठीशी आहोत तुम्हाला लागेल ती मदत आम्ही करू असा आधार त्यांनी बोलताना आजी-आजोबांना दिला.

यावेळी स्वामी समर्थ वृद्धाश्रमाच्या वतीने जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, मनोज मस्के,लहू जाधव,पाशाभाई शेख, शाहरुख पटेल, आसेफ शेख यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन कार्यक्रम संपन्न

केज ■ तात्या गवळी



केजःसानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी ' वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन असे दोन कार्यक्रम आज घेण्यात आले.सर्व प्रथम सामुहिक वाचन घेण्यात आले. युवक वाचक व जेष्ठ नागरीक यांचे सामुहिक वाचन झाले.

त्यानंतर शालेय विद्यार्थी - विद्यार्थीनींचे सामुहिक वाचन पार पडले. विद्यार्थी - विद्यार्थीनीं साठी घेण्यात आलेल्या सामुहिक वाचनात यश भोगजकर, कल्याणी घोगले, पृथ्वीराज घोगले, कृष्णराजे गायकवाड, यश जोगदंड, दिव्या साबळे, स्वरा गायकवाड, मयुरी गायकवाड यांच्या सह अनेक विद्यार्थी - विद्यार्थींनी सामहिक वाचन आपआप आपल्या आवडीच्या पुस्तकाचे केले.

त्यानंतर युवक व जेष्ठ नागरिकांनीही सहभागी होऊन आवडीच्या पुस्तकाचे सामुहिक वाचन केले.

यात रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, आनंद गायकवाड, आरुण गायकवाड, नारायण गायकवाड, बब्रुवान गायकवाड, दादासाहेब गायकवाड, शिवाजी गायकवार,रामकृष्ण(तात्या) गायकवाड, रामराव गायकवाड, भतेरीनाथ पोळ, सुधीर गायकवाड, प्रकाश गायकवाड, बालासाहेब वैरागे, बन्सीनाना गायकवाड, रविंद्र गायकवाड (पेंटर), रंजीत पाटील, एस. के. वैरागे, छगननाना गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांलासहअनेकयुवक, जेष्ठ नागरिक यांनी सामुहिक वाचन केले.

त्यानंतर ' वाचन कौशल्य कार्यशाळा' घेण्यात आली.या कार्यशाळेत माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, वसुदेव(बप्पा) गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननना गायकवाड यांनी सखोल ' वाचन कौशल्य कार्यशाळेत' मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत विद्यार्थी - विद्यार्थीनी, वाचक, युवक, जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.या वेळी रंजीत पाटील, रविंद्र गायकवाड (पेंटर), एस. के. वेरो, मयुरी गायकवाड, यांनीही मागदर्शन केले. सलग चाललेल्या ग्रंथप्रदर्शनालाही लहाण मचलांचा सर्वोत्तम प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी बन्सीनाना गायकवाड हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन आनंद गायकवाड यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दी पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



आराखड्यानुसार स्मारकासाठी निधी देणार

सातारा ■ दिलीप येवले

सातारा : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आणखी पाच वर्षांनी द्विशताब्दी साजरी होणार आहे. त्यापूर्वी त्यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करा. त्यासाठी प्रशासनाने १० एकर जमिनीचे तात्काळ अधिग्रहण करावे, असे निर्देश देऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन व सातारा जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त नायगाव, ता. खंडाळा येथे आयोजित सावित्रीमाई जयंती उत्सवास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आमदार सर्वश्री छगन भुजबळ, अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले आदी मान्यवर उपस्थित होते.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेल्या सन्मार्गावर चालून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचे काम करू, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जिवंत स्मारक म्हणजे सक्षम महिला होय. त्यांचा विचार समाजात तळागाळापर्यंत रुजवून स्वयंपूर्ण व स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभारणाऱ्या महिला घडविण्याचे कार्य शासन करेल. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्याने पुढील काळात निश्चितपणे महिलाराज येईल. केंद्र शासनाच्या लखपतीदीदींसारख्या योजनेच्या माध्यमातून येणाऱ्या दोन तीन वर्षात ५० लाख महिलांना लखपती दीदी घडविण्याचे कार्य शासनाने हाती घेतले आहे.

या देशावर, महाराष्ट्रावर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे फार मोठे उपकार आहेत, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्या काळात स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागणूक मिळत होती त्या काळात समाजातील विषमता दूर करून समतेचे बीजारोपण करण्याचे कार्य फुले दांपत्याने केले. शिव्या शाप, शेण गोळे खावे लागले तरी सावित्रीबाई फुले यांनी न डगमगता स्त्रियांना गुलामीतून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची ज्योत पेटवली. या कार्यात महात्मा फुले हे हिमालयाप्रमाणे त्यांच्या सोबत होते. त्यांनी विधवांच्या केशवपन, बालहत्या यासारख्या बाबींना कृतिशील विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. समाज परिवर्तनाच्या अनेक चळवळींचे नेतृत्व सावित्रीबाई फुले यांनी केले, याची कबुली स्वतः महात्मा फुले यांनी अनेकदा दिलेली आहे. थोर माणसांचे कार्य कधीही संपत नाही, त्यांचे स्मारक उभा करत असताना पुतळ्यासोबतच विचारांचेही स्मारक झाले पाहिजे, असेही मत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी योवळी व्यक्त केले.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्री शिक्षणाची सुरवात झाल्यामुळे आज महिला समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात यशाची शिखरे गाठत आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थान असलेले हे गाव ग्रामविकास मंत्री म्हणून मी दत्तक घेत आहे. यापुढे कामासाठी निवेदने येणार नाहीत, या पध्दतीने नायगावचा विकास केला जाईल. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव प्रेरणास्थान असून त्यांचे विचार उर्जा देणारे आहेत. त्यांच्या सन्मानाला साजेसे स्मारक उभारण्यासाठी दहा एकर जागा शासनाने खरेदी करावी व स्मारकासाठी १२५ कोटी रुपये द्यावेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विकास आराखडा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी केली. स्मारकाचे काम मंजूर झाल्यानंतर हे स्मारक दोन वर्षाच्या आत उभे राहील. या स्मारकामध्ये महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षणे देण्यात येतील. महिलांना स्वतःच्या पायावर उभे करुन आर्थिक सक्षम केले जाईल, अशी ग्वाहीही श्री. गोरे यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील म्हणाले, १ जानेवारी १८४८ ला मुलींच्या पहिल्या शाळेची सुरुवात करून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी वर्षानुवर्ष प्रगतीपासून दूर असणाऱ्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यास सुरुवात केली. फुले दांपत्याने समाजाला दिशा दाखवण्याबरोबरच अंधकारातून व अंधश्रध्देतून बाहेर काढले. आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत याचे श्रेय फुले दांपत्याचे आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ असलेल्या नायगावच्या विकासासाठी आतापर्यंत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले आहेत, यापुढेही ते अखंड सुरू राहतील. नायगाव हे आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील.

आमदार छगन भुजबळ यांनी फुले दांपत्याचा विरोध हा ब्राह्मण्यवादाला होता, कोणत्या जातीपातीला नव्हता असे सांगून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या जीवनातील महत्त्वाची ठिकाणे जोडण्याचे काम मार्गी त्वरित लावावे, तसेच सावित्रीबाई फुले यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार हा ३ जानेवारी रोजी नायगाव येथील कार्यक्रमातच दिला जावा, फुले दांपत्याच्या साहित्याचे पुनर्मुद्रण व्हावे अशी मागणीही त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळी यांच्या असलेल्या स्मारकास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यांनतर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शिल्पसृष्टीचीही पाहणी केली. या ठिकाणी स्मारक उभारणी आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमात विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये ब वर्ग पर्यटन क्षेत्रांतर्गत उभारण्यात आलेल्या शासकीय प्रतिक्षालयाचे उद्घाटन, जलजीवन मिशन अंतर्गत वॉटर एटीएमचे उद्घाटन, महाज्योतीच्या विविध योजनांच्या प्रदर्शन दालनांचे उद्घाटन, महिला बचतगटांच्या उत्पादित वस्तूंच्या विक्री स्टॉल्सचे उद्घाटन, जिल्हा परिषद शाळेतील निबंध चित्रकला व वकृत्त्व, स्पर्धेतील विजेते, विद्यार्थी यांच्या बक्षिस वितरण, यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार मदन भोसले, सरपंच स्वाती जमदाडे, गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, नितीन घुले यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला, अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भीमा कोरेगाव शूरविरांना मानवंदना

काटोल ■ प्रशांत पवार





काटोल : काटोल समता सैनिक दल दिक्षाभूमी नागपूर यांच्या वतीने रॅली काढण्यात आली जय भीम समता सैनिक दल काटोल व नरखेड दो तालुका मिळून सयुक्त रॅली तालुका अध्यक्ष सौ. सुजाता नंदकिशोर डबरासे. सचिव नीलिमा बागडे. व नरखेड व काटोल शूर विरांना आपले ५००सैनिक शहीद झाले मनःवंदना देण्यासाठी समता सैनिक दल बहुजन वंचित क्रन्ति सेना सैनिक वीर शाहिद मनःवंदना भीमा कोरेगाव लढाईत शहीद वीर पुत्रांना मानवंदना देण्यासाठी उपस्थित अतिथी आणि मान्यवर व समता सैनिक व गाव शाखा सैनिक तसेच काटोल तालुका अध्यक्ष सुजाता नंदकिशोर डबरासे. सचिव नीलिमा बागडे व नरखेड तालुका अध्यक्ष दीपा अनिल गोरडखे. व नरखेड शाखा शारदा पचभाई. काटोल व नरखेड मिळून सयुक्त रॅली काढण्यात आली सर्व शाखेचे सैनिक सहभागी झाले. व सहकार्य पण केलं. काटोल तालुका आणि नरखेड शाखा ढवळापूर
लिगा. घरतवाडा. सवळी. येणवा. जाऊरवा. लाखोई. कचारी सावगा. परडसिंगा. रिधोरा. नरखेड. धोत्रा मोहोदी. पिपंळगाव. देवथुगांव. देवळी. मनातखेडी. समता सैनिक दल सुजाता डबरासे. नीलिमा बागडे. दीपा गोरखडे. शारदा पाचभाई. बहुजन वंचित क्रांती सेना चे दिगांबर भाऊ डोगरे. व सर्व उपस्थित माझे सैनिक पचशील बोद्ध विहार रेल्वे स्टेशन पासून डॉ बाबासाहेब आबेडकर चौक काटोल पासून विजय स्तभ घेऊन रॅली काढण्यात आली. बाबासाहेब आबेडकर प्रतिमेला मालयार्पण सुजाता डबरासे. दीपा गोरडखे. याचा हस्थे माल्यर्पण करून शाहिद झाल्या सैनिक बद्दल माहिती देण्यात आली. सर्व सैनिक कानी मनःवंदना गीत व सलामी देण्यात आली. सुजाता डबरासे. नीलिमा बागडे. दीपा गोरखेडे. शारदा पाचभाई. शालू सरदार. वर्षा निकोसे. जयश्री वाहने. अनिल गोरखेडे. शोभा पाटील. मीना ताई पाटील. मिनल ताई सोमकुवर. अर्चना सोमकुवर. इदिरा गजभिये. प्रज्ञा डोगरे. मालती गोडाने. नलिनीताई. नितीन पाचभाई. ममता वाहने. मीना पाचभाई. डिंपल मुलताईकर. गजभिये ताई. कविता गजभिये. अर्चना पाचभाई. वंदना बागडे. बबिता चक्रपाणी. दिगांबर भाऊ डोगरे. विजय भाऊ डहाट. अर्जुन शेंडे अनिल लोखंडे. नीलकंठ गजभिये. प्रेमकुमार सोमकुवर. शंकरराव काळबांडे. बाबा तागडे. कृष्णा ढोके. दिगांबर भगत. विनायक वागमारे. लक्षमाण बागडे. व उपस्थिती दाखवू शौर्य दिनाच्या कार्यक्रम मोठया उत्सहाणे आणि हर्षाने साजरा करण्यात आला.

समता कॉन्व्हेंट मूर्तीतर्फे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

काटोल ■ प्रशांत पवार



काटोलः समता कॉन्व्हेंट मूर्ती तर्फे विद्यार्थी टीचर व पालक वर्गांतर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला वर्गामध्ये सावित्री आईच्या वेशात मुलींना बोलावले होते प्रसंगी सावित्रीबाई फुले च्या जीवनपटावर उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले संस्थेचे संचालक तसेच टीचर डिम्पल घागरकर कोमल गाखरे पालक वर्गामधून भाग्यश्री डोंगरे यांनी आपापले मनोगत व्यक्त केले संस्था संचालकांनी सावित्रीबाई फुले यांचे जीवन श्री जाती करता एक वरदान असून यापुढे घराघरात सावित्री आई घडाव्यात यासाठी महिलांनी आपल्या मुलींना शिक्षण देण्याचे आवाहन केले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाचा अभ्यास करावा प्रसंगी आवाहन करण्यात आले. पालकांचा उत्साह बघून सावित्रीबाई फुले यांच्या नावांचा जयघोष करण्यात आला सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला माल्यार्पण करून तसेच पूजा करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. सावित्रीबाई जयंती कार्यक्रम प्रमुख म्हणून मयुरी पवार यांना स्थान देण्यात आले होते त्यांच्यातर्फे मुलांना खाऊ वाटण्यात आला. सूत्रसंचालन टीचर कोमल गाखरे यांनी तर आभार डिंपल घागरकर यांनी मानले.

भारतीय बौद्ध महासभा शाखा जय भोले नगर व सुजाता महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती साजरी

खापरखेडा ■ दिलीप येवले



खापरखेडा : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही थोर समाज सुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जय भोले नगर च्या वतीने ३ जानेवारी २०२५ रोजी भारतीय बौद्ध महासभा व सुजाता महिला मंडळाच्या वतीने सावित्रीबाई फुले यांचा जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम सामाजिक क्रांतीच्या लढ्यात संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या संत महापुरुषांना पुष्पमालेने स्वागत करण्यात आले. दीप प्रज्वलित करून सर्व महिलांच्या उपस्थितीमध्ये केक कापण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरिश्चंद्र पाटील यांनी केले व आभार प्रदर्शन शाखेच्या उपाध्यक्ष वैशाली रामटेके यांनी केले.

मंचावर उपस्थित अध्यक्ष कृष्णाजी नानवटकर, उपाध्यक्ष रामटेकेताई, पुष्पाताई येवले, विजया चव्हाण, सुकेशनी खांडेकर, सामाजिक कार्यकर्ता शशिकला बनसोड, लक्ष्मी पाटील, पुष्पाताई वाघमारे, जयमाला पाटील, पोर्णिमा ढोके, नलू गोडबोले, वैशाली ढोरे, विमल पाटील, सायली मानवटकर, बागडेताई, चंद्रकला सोमकुवर, मिलिंद पाटील, गंगाधर गजभिये, केवलराम सोमकुवर, भीमराव बागडे, सिद्धार्थ बागडे, सुधाकर खांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. किरणकुमार धिमधिमे यांना पीएच.डी प्रदान



केज ■ तात्या गवळी

केजः केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख किरणकुमार मोहन धीमधीमे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर विद्यापीठाने समाजशास्त्र विषयात पीएच डी प्रदान केली. या यशाबद्दल

माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील ,खासदार रजनीताई पाटील, संस्थेचे सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे, संशोधक मार्गदर्शक डॉ. नवनाथ शिंदे, सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. बी. पाटील, विजय शिनगारे ,डॉ. हनुमंत सौदागर, प्राध्यापक शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे त्यांनी डॉ. नवनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्य संस्थेत मागासवर्गीय महिलांचा सहभाग आणि सबलीकरण विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.

बोधिसत्त्व विद्यालयात बालिका दिन साजरा

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ : बोधिसत्व विद्यालय अडेगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन ३ जानेवारी रोजी बालिका दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मनिष थूल उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मिशन समृद्धीचे अतुल नाईक उपस्थित होते

प्रास्ताविक धनंजय खोंडे यांनी केले ., संचालन सौ मृणालिनी दातार यांनी केले. कार्यक्रमात सक्षम पोराटे, ध्रुव आत्राम, खूषी डुकरे, जानवी मानकर ,देवयानी आत्राम, सानिया कांबळे ,हिमांशू हांडे, धरती व्यवहारे, कोमल ठाकरे ,प्रतिज्ञा मगर ,वेदिका मगर, योगिता पचारे, प्रगती हांडे, ज्वाली थोटे, मंथन इंगळे, वेदिका डुकरे, साक्षी सराटे, रिद्धी जगताप या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. आभार राजेंद्र वडाळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता रमेश पोराटे, उमाकांत रीठे, मनीष खोडके, तनुजा चीखलकर, नारेशचद्र कोठेकर, आशिष भगत, अनिल सातघरे, यांनी सहकार्य केले.

राष्ट्रसंत भगवानबाबा चौकातील पोस्टरची अज्ञाताकडून विटंबना!

केज ■ तात्या गवळी

केज तालुक्यातील सातेफळ गावातील घटना; अज्ञात समाजकंटका विरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल तालुक्यात शांतता राखण्याचे सहा.पो. अधिक्षक कमलेश मीना यांचे जनतेला आवाहन



केजः केज तालुक्यातील मस्साजोग येथील घटना ताजी असतानाच आणि हे वातावरण गरम असतानाच सातेफळ गावातील राष्ट्रसंत भगवानबाबा चौकातील पोस्टरची अज्ञात समाजकंटका कडून फाडुन विटंबना करण्यात आली असल्याने समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. त्या अनुषंगाने केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. सदरली घटनेची पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन अज्ञात व्यक्तीविरुद्ध युसूफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी संपुर्ण महाराष्ट्रभर जातीय तेढ निर्माण झाली असून पोलिस प्रशासनाने या घटनेमध्ये संपुर्ण लक्ष घातले आहे. हे वातावरण अगोदरच गरम असतानाच केज तालुक्यातील सातेफळ गावातील राष्ट्रसंत भगवानबाबा चौकातील पोस्टरची अज्ञात समाज कंटकाकडुन फाडुन विटंबना करण्यात आली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे केज तालुक्यातील तरुणांनी केजचे तहसीलदार यांना निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की केज तालुक्यातील सातेफळ गावातील राष्ट्रसंत भगवानबाबा चौकात लावण्यात आलेले राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे पोस्टर काही अज्ञात समाज कंटकाकडुन फाडुन त्याची विटंबना केली आहे. या कृत्यामुळे सर्व धर्मांच्या धार्मिक व सामाजिक भावना दुखावल्या आहेत. तशा प्रकारचे निवेदन केज तहसीलदार यांना देण्यात आले असून निवेदनावर प्रदिप बिक्कड, रोहीत धस, अशोक जाधवर ,संतोष केदार, रमेश केदार, अशोक चौरे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या बाबत शासन आणि प्रशासन सज्ज झाले असून या घटनेची पोलिसांनी तात्काळ दखल घेतली असून केज उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधिक्षक यांनी पोलिसांना सतर्क केले आहे. त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की केज तालुक्यातील सातेफळ गावातील दि. १ जानेवारी २०२५ रोजी रात्री १०:३० ते ११:०० वाजण्याच्या दरम्यान काही अज्ञात समाजकंटकाने राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या प्रतिमेचे पोस्टर फाडून समाजाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे केज तालुक्यातील युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता बिन. एन. एस. २९९ नुसार अज्ञात समाजकंटका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास पोलीस करत आहेत. तसेच या घटनेतील आरोपींना लवकरात लवकर पकडण्यात येणार असून त्याच्या विरुद्ध कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार आहे. आणि कायद्याच्या विरुद्ध अशा प्रकारच्या घटना कोणीही करू नयेत. अन्यथा अशा समाजकंटका विरुद्ध कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच कोणीही समाजातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करु नये. सर्वांनी शांतता ठेवण्याचे आवाहन केज उपविभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक श्री कमलेश मीना यांनी प्रसार माध्यमांद्वारे जनतेला केले आहे.

देशमुख हत्याकांडः खा. सोनवणेंनी ठोठावला मानव अधिकार आयोगाचा दरवाजा; दिल्लीत प्रियांक क्रानूनगोंची घेतली भेट

केज ■ तात्या गवळी



केजः मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला २५ दिवस उलटले तरी अद्याप मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना ही शरमेची बाब आहे. यामुळे राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने यात स्वतंत्रपणे चौकशी करावी, असे निवेदन खा. बजरंग सोनवणे यांनी आयोगाचे सदस्य प्रियांक क्रानूनगो यांना भेटून दिले आहे.

दि. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खा. सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. परिणामी, या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक व शारीरिक छळ करुन हत्या झाली. पोलीसांनी वेळेत सुत्र फिरविले असते तर कदाचित स्व. संतोष देशमुख यांचा जीव वाचलाही असता. दरम्यान, त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईटपध्दतीने मारहाण केली की शरिरावर जागा देखील शिल्लक नव्हती. त्यांच्या देहाला चटके देखील देण्यात आले. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुषपध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे. दि. ९ डिसेंबर रोजी हत्या झालेली असून यातील चार आरोपी अटक आहेत तर ३ अद्याप फरार आहेत. सदरील प्रकरणात राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून तपास करावा, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी आज दि. ३ जानेवारी रोजी दिल्ली येथे मानव अधिकार आयोगाचे प्रियांक क्रानूनगो यांच्याकडे केली आहे. संतोष देशमुख यांच्या खुन्यांना शिक्षा देऊन देशमुख कुटूंबियांना न्याय देण्यासाठी खा. सोनवणे यांनी पहिल्या दिवसांपासून ठोस भुमिका घेतलेली आहे. यासाठी संसदेत आवाज उठविणे, संसदेबाहेर आवाज उठविणे, पोलीस यंत्रणेशी बोलणे आणि कायद्याच्या कसोटीवर तपास करून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

शासनाकडे जमा जमिनी शेतकऱ्यांना मिळणार परतः मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; ९६३ शेतकऱ्यांना महायुती सरकारचा मोठा दिलासा

मुंबई ■ दिलीप येवले

मुंबई : शेतसारा अथवा महसुली देणी देवू शकले नाहीत अशा शेतकऱ्यांच्या सरकारने जप्त केलेल्या जमिनी, ज्याला आकारी पड जमिनी म्हणतात त्या पुन्हा त्याच शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला.

या निर्णयामुळे राज्यातील ९६३ शेतकऱ्यांना सरकारने दिलासा दिला. ही जमीन रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना परत घेता येईल.

जप्त असलेल्या या जमिनी वर्ग दोनच्या असून त्यांचा ताबा जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे. या जमिनींच्या संदर्भात देय आकाराच्या रकमा व त्यावरील व्याज यांच्या वसुलीसाठी १२ वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर जमिनींचा लिलाव करण्यात येतो. लिलावाच्या रकमेतून शासनाचे येणे वसूल केले जाते आणि उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना परत केली जाते. ही उर्वरित रक्कम शेतकऱ्यांनी शासनाला द्यायच्या रकमेपेक्षा खूप जास्त असते. शासनाला मिळणाऱ्या अल्परकमेसाठी शेतकऱ्यांची जमीन वर्षानुवर्षे शासनाकडे पडून राहण्यापेक्षा रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना परत मिळावी यासाठी हा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. या जमिनी वर्ग एकमध्ये आणून ज्या शेतकऱ्यांच्या होत्या त्यांच्याच नावे करता येतील. यासाठी राज्य सरकार कायद्यात सुधारणा करणार आहे.

या संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकारांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यातील ९६३ शेतर्कऱ्यांच्या चार हजार ९४९ हेक्टर आर जमिनी शासन जमा झाल्या होत्या. शेतसारा न भरल्यामुळे या जमिनी संबंधित तहसीलदारांनी शासनाकडे जमा केल्या होत्या. आज मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण ९६३ शेतर्कऱ्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला आहे. रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून ही जमीन पुन्हा नावावर केली जाईल.

शेतकऱ्यांना मोठा दिलासा

महसूल विभागाचा मंत्री म्हणून शेतकऱ्यांसाठी आजचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. आता कायद्यात सुधारणा होतील. माझी सुरूवातच माझ्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्याने झाली, याचा मला आनंद आहे. दुष्काळ अथवा अनेक अडचणींनी ज्या शेतकऱ्यांनी सरकारला महसूल दिला नाही, त्यामुळे या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. किमान पन्नास वर्षांपासून याबाबतचा निर्णय प्रलंबित होता. आज शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

- चंद्रशेखर बावनकुळे
महसूल मंत्री

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम'; नागपूर विभागातील ४५० महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांद्वारे पुस्तक वाचन

नागपूर ■ दिलीप येवले

राज्यात जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात ४५ लाखांवर विद्यार्थी वाचणार पुस्तके

नागपूरः 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अनोख्या उपक्रमास पहिल्याच दिवशी नागपूर विभागातील जवळपास ४५० पेक्षा अधिक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाचन करुन उत्स्फूर्त सहभाग घेतल्याची माहिती, उच्च शिक्षण विभाग नागपुरचे सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण यांनी दिली आहे.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान सर्व विद्यापीठेआणि महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधून आणि राज्यातील वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी या उपक्रमास १ जानेवारी पासून सुरुवात झाली आहे. या वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्यातील ६ हजार महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला. महाविद्यालयांच्या सभागृह व ग्रंथालयामध्ये जवळपास ४५ लाखांवरील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पुस्तकांचे सामूहिक वाचन सुरु केले आहे.

या पंधरवाड्यात सहभागी प्रत्येक विद्यार्थी एक पुस्तक वाचून संकल्प पूर्ण करणार आहे. म्हणजेच ४५ लाखांवर पुस्तक वाचून राज्यात एक नवा विक्रम घडणार आहे. या पंधरवड्या दरम्यान विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढविण्यासाठी 'वाचन कौशल्य कार्यशाळा',स्थानिक लेखकांना निमंत्रित करुन 'विद्यार्थी-वाचक व लेखक' या परिसंवादाचे आयोजन, पुस्तक परिक्षण स्पर्धा आणि कथन स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम'; शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनास सुरुवात

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनास सुरुवात झाली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान हा उपक्रम राबविण्याचे येत आहे. या अंतर्गत शासकीय विभागीय ग्रंथालयात १ जानेवारी रोजी अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व सभासदांच्या उपस्थितीत ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. सभासद नोंदणीकरिता ६१० रुपयांमध्ये विभागीय ग्रंथालयाचे आवजीवन सभासदत्व देण्यात येत आहे.

ग्रंथप्रदर्शनादरम्यान चर्चा, सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. नागरिक, वाचक, सभासद, विद्यार्थी, अभ्यासक यांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन ग्रंथपाल रामदास साठे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

श्री समर्थ वाचनालय आष्टीतर्फे वाचन संकल्प अभियान

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद) : दिनांक १ जानेवारी २०२५ला वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानांतर्गत वाचनालया तर्फे ग्रंथप्रदर्शनी भरवून सामूहिक वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या सामूहिक वाचनाच्या कार्यक्रमाचा लाभ शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतला. तसेच एक ते १५ जानेवारी २०२५ या दरम्यान वाचन कौशल्य कार्यशाळा ,वाचन संवाद व पुस्तक परीक्षण स्पर्धा घेण्यात येणार आहे .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचनालयाचे अध्यक्ष श्री संजयजी देशपांडे सचिव श्री यशवंतराव दारोकार व वाचनालयाचे ग्रंथपालश्री मोहन निंभोरकर व कर्मचारी यांनी यशस्वी प्रयत्न केले.

व्यक्तीला आधार, तसा आता पायाभूत सुविधा प्रकल्पाला सुद्धा युनिक आयडी

मुंबई ■ दिलीप येवले

सर्व समाज विकास महामंडळे एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणणार, ई-कॅबिनेटचेही सूतोवाच

मुंबई : आधार हा जसा एका व्यक्तीचा युनिक आयडी असतो, तसाच युनिक आयडी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी तयार करण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री उपस्थित होते.

अनेक विभाग एकाच ठिकाणी एकाच प्रकारची विकास कामे करतात. त्यातून तीच ती कामे होऊन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. आधार क्रमांकामुळे जसे अनेक बोगस लाभार्थी आणि तीच ती नावे वगळली गेली, तसेच या निर्णयामुळे त्याच त्या विकास कामांची पुनरावृत्ती टाळता येणार आहे. यातून विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे आणि त्यात सुसूत्रता असावी, यासाठी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाला युनिक आयडी असावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे कोणत्या भागात, कोणत्या कामाचे नियोजन केले आहे आणि नेमके कोठे, कोणत्या प्रकल्पाची गरज आहे, हे एकत्रितपणे एका डॅशबोर्डवर उपलब्ध असेल. त्यामुळे नेमक्या कोणत्या प्रकल्पाची कुठे गरज आहे, हे सुद्धा सहजतेने कळेल. यातून संतुलित विकास साधता येईल आणि निधी, श्रमशक्ती याचा सुयोग्य वापर होईल. ही माहिती पीएम गतिशक्ती पोर्टल, ग्रामविकास पोर्टल, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) इत्यादींशी एकिकृत असेल. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी एक समिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित केली. यात नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (व्यय) सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समावेश आहे. या समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर करायचा आहे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

याचप्रमाणे राज्यातील सर्व समाज विकास महामंडळे एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णय सुद्धा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यामुळे सर्व विकास महामंडळाच्या सर्व योजना एका ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे 'इज ऑफ लिव्हिंग'चा उद्देश साध्य होणार आहे, शिवाय सर्व समाजघटकांना एकाच ठिकाणी सर्व योजना आणि त्याचे लाभ घेता येणार आहेत. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी सुद्धा ४ अधिकाऱ्यांची समिती गठित करण्यात आली आहे. यात नगरविकास-१ चे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, ग्रामविकास सचिव विजय वाघमारे, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचा समावेश आहे. यांनाही राज्य मंत्रिमंडळाला आपला अहवाल सादर करायचा आहे.

याच बैठकीत 'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चे सूतोवाच करण्यात आले. राज्य मंत्रिमंडळाचा संपूर्ण मसुदा हा टॅबच्या माध्यमातून हाताळण्यात यावा, यातून कागदाची बचत होऊन पर्यावरण जपले जाईल, ही त्यामागची भावना आहे.

भीमा कोरेगावचे युद्ध आत्मसन्मानाचे-गजघाटे

दीक्षाभूमीवर शौर्य दिनी मानवंदन

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः नागपूरः भीमा कोरेगावची लढाई ही आत्मसन्मान आणि स्वाभीमानाची होती असे मत दीक्षाभूमीवर आयोजित शौर्य दिनानिमीत्ताने आयोजित एका समारंभात मान्यवर वक्त्यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, आणि जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्मारक समितीचे सदस्य विलासगजघाटे होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार, लेखक प्रभाकर दुपारे, कमलताई भगत, रोशनी गायकवाड, मीनाताई मून, रंजना वासे, प्रा, सुभाष शेंडे, यांनी यावेळी आपले मत व्यक्त केले. यावेळी बोलतांना गजघाटे म्हणाले की, भीमा कोरेगाव ची लढाई ही ईतिहासात अजरामर घटना आहे. भीमा कोरेगाव मध्ये लढलेल्या सैनिकांचे शौर्य आजही समाजाला प्रेरणा देत राहिल. समाजाने आज एकसंघ राहणे ही काळाची गरज आहे. दीक्षाभूमीवर यापुढेही दीक्षा समारंभा व्यतीरिक्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक शरद मेश्राम यांनी केले तर आभार राभाऊ बागडे यांनी मानले, कार्यक्रमाच्या आयोजनात देवाजी रंगारी, मधुकर मेश्राम, सुनील भोसले, सतीश वाहने, प्रदीप मून, गौरीशंकर श्रावणकर, सुरेश वानखेडे, सुरेश गेडाम, कैलाश राव, गौतम घुपे, मीना खैरकर, माध्यमा सवाई, यशोधरा श्रावनकर, रंजना विमल रामटेके, विद्या मून उपस्थित होत्या.

सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' उपक्रम साजरा

कोराडी ■ **दिलीप येवले**



कोराडी : रवि बहुउद्?देशीय शैक्षणिक संस्था संचालित सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी, महादुला, कोराडी येथे दि. ३१ डिसेंबर २०२४ पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीत फार्मसी क्षेत्रातील विविध प्रकारचे पुस्तके प्रदर्शीत करण्यात आले.

वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. अलीकडच्या काळात देशाचा तरुण वाचन संस्कृतीपासून दुरावत चाललेला असलेल्याचे आढळून येते. त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान हा उपक्रम राबविण्याचे येत आहे. या अंतर्गत शासकीय विभागीय ग्रंथालयात १ जानेवारी रोजी अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व सभासदांच्या उपस्थितीत ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. सभासद नोंदणीकरिता ६१० रुपयांमध्ये विभागीय ग्रंथालयाचे आवजीवन सभासदत्व देण्यात येत आहे.

ग्रंथप्रदर्शनादरम्यान चर्चा, सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. नागरिक, वाचक, सभासद, विद्यार्थी, अभ्यासक यांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन ग्रंथपाल रामदास साठे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

हा उपक्रम दरवर्षी १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात यावा. या उपक्रमाची सुरवात १ जानेवारी २०२५ पासून करावी. या अंतर्गत महाविद्यालयाने आयोजित केलेल्या पुस्तक प्रदर्शन सोनेकर रवि बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष के. पी. सोनेकर, महाविद्यालयाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबवावा. सचिव एम. पी. सोनेकर, सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये, शिक्षक व शिक्षकतेर कर्मचारी व अधिकाधिक विदयार्थी उपस्थित होते. हे प्रदर्शन यशस्वीरित्या पार पाडण्यास राष्ट्रिय सेवा योजना डॉ. आर. ए. साहु, प्राध्यापक आर. आर. मिश्रा यांनी विशेष प्रयत्न केले.

सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी आणि नगरपंचायत महादुला यांच्या संयुक्त विद्यामाने स्वच्छता रॅलीचे आयोजन

कोराडी ■ **दिलीप येवले**



कोराडीः दि. १७ डिसेंबर २०२४ ते १९ डिसेंबर २०२४ या कालावधीत देशभरात स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा अभियान ५.० साजरे केले गेले. याअंतर्गत प्लास्टिक मुक्त महादुला शहर व घनकचरा विलगीकरण या विषयाच्या जनजागृती करिता तसेच आपले शहर स्वच्छ सुंदर आणि प्लास्टिक मुक्त करण्याचा दृष्टिने स्वच्छतेविषयक जनजागृती रॅलीचे आयोजन सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी महादुला आणि नगरपंचायत महादुला यांच्या संयुक्त विद्यामाने दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी महादुला परिसरात करण्यात आले होते.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा अभियान ५.०' हे भारत सरकारने सुरू केलेले एक महत्त्वपूर्ण अभियान आहे. ज्याच्या मुख्य उद्देश आपल्या समाजात स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि स्वच्छतेला जिवनाचा अविभाज्य भाग बनविणे आहे. या मोहिमे अंतर्गत सर्वप्रथम नगरपंचायत महाहुला येथे स्वच्छतेची शपथ विधी पार पाडली. त्यानंतर रॅलीचे आयोजन पार पडले.

सदर आयोजनास नगरपंचायत महादुलाचे मुख्याधिकारी शुभम पाटिल, प्रशासकीय आधकारी आमटे, कार्यकारी अधिकारी शुभम मोहिते तसेच नगरपंचायत मधील पदाधिकारी, रवी बहुउद्?देशीय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष के. पी. सोनेकर, सचिव एम. पी. सोनेकर, सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये, रसोयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर.ए. साहू उपस्थित होते.

स्वाधार योजनेचे अर्ज करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता आदि आवश्यक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेसाठी सन २०२४-२५ मधील अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून आता विद्यार्थ्यांना दिनांक १५ जानेवारीपर्यंत https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे संपर्क साधावा व पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करुन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

धान खरेदीच्या ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : खरीप पणन २०२४-२५ मधील धान खरेदीच्या ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी यापूर्वी दि. ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु बरेच शेतकरी नोंदणी अभावी वंचित असल्यामुळे शासनाकडून ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

ही मुदतवाढ ही अंतिम असून यापुढे धान, भरडधान्य उत्पादक शेतकरी नोंदणीस कोणत्याही कारणास्तव मुदवाढ देण्यात येणार नाही. तरी १५ जानेवारी २०२५ पूर्वी धान खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोंदणी करावी. नोंदणी करताना शेतकऱ्यांचा ऑनलाईन ७/१२, पीक पेऱ्यांची नोंद, आधार कार्ड, चालु बँक खाते आवश्यक असणार आहे. आपल्या नजीकच्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले आहे.

नागपूर येथे आदिवासी विकास राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचा महासंग्राम

नागपूर ■ दिलीप येवले

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार उद्घाटन
१ हजार ९१७ खेळाडू दाखविणार क्रीडा कौशल्य

नागपूर : आदिवासी विकास विभागाच्या तीन दिवसीय राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचे उद्घाटन केंद्रीय रस्ते, परिवहन, व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी ,नागपूर येथील मैदानावर होणार आहे. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या महासंग्रामात राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील १ हजार ९१७ आदिवासी खेळाडू आपल्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य व नैपुण्य दाखविणार आहेत. या क्रीडा संमेलनाची भव्यता अनुभवायला मिळणार असून नवीन वर्षात क्रीडामय वातावरणात चित्तथरारक व चुरशीच्या सामन्याचा आनंद क्रीडाप्रेमींना लुटायला मिळणार आहे.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या उद्घाटन समारंभास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ, नियोजन, विधी व न्याय राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.



प्रमुख अतिथी म्हणून खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, आमदार सुधाकर अडबाले, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार कृपाल तुमाने, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार मोहन मते, आमदार विकास ठाकरे, आमदार समीर मेघे, आमदार चरणसिंह ठाकूर, आमदार डॉ. आशिष देशमुख, आमदार संजय मेश्राम, जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकड्डे उपस्थित राहणार आहेत.

विशेष अतिथी म्हणून विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, नागपूर महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस वितरण होणार आहे. राज्यातील नागपूर, नाशिक, ठाणे व अमरावती या चार विभागातील खेळाडू ३ ते ५ जानेवारी या कालावधीत राज्यस्तरावर आपल्यातील क्रीडा गुण व प्रतिभा, कौशल्य प्रदर्शित करणार आहेत. वयवर्षे १४, १७ व १९ वयोगटातील कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, रिले या सांघिक तसेच लांबउडी, उंचउडी, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, धावणे आदी वैयक्तिक खेळात ही स्पर्धा होत आहे. या निमित्ताने राज्यातील आश्रम शाळेतील खेळाडूंना राज्यस्तरावर क्रीडा क्षेत्रात आपले नावलौकिक करण्याची मोठी संधी उपलब्ध झालेली आहे.

या क्रीडा संमेलनात नागपूर विभागातील शासकीय आश्रम शाळांमध्ये राबविल्या जात असलेल्या ब्रायटर माईंड, मेमरी इन्हान्समेंट, बोलका वर्ग उपक्रम व मलखांब कौशल्याचे सादरीकरण केल्या जाणार आहे. राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असून आदिवासी विकास सचिव विजय वाघमारे, आयुक्त नयना गुंडे यांच्या नियंत्रणात नागपूर विभागाचे अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी राज्यात झाली आहे.



जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242